संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती
सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६
❖ पाने : ८ ❖ अंक : २२६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला नवसंजीवनी

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह : 'राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळा'चे मुख्यालय महाराष्ट्रात होणार

■ मुंबई (दै. संध्या)

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यासाठी 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी आज व्यक्त केला. देशातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांनी राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलवण्यात येईल, अशी घोषणा केली. बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित 'सहकार नव-क्रांती मेळावा' कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पणन मंत्री जयकुमार रावल, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष कुमार भूटानी तसेच अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शहा म्हणाले की, देशातील प्रत्येक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने, अगदी एका शाखेच्या



बँकेनेही अंब्रेला ऑर्गनायझेशनचे सदस्यत्व घ्यावे. सदस्यत्व घेतल्यानंतर सुरक्षा संचालन केंद्राशी (सिक्युरिटी ऑपरेशन सेंटरशी) जोडले जावे. यामुळे बँकांमधील ठेवीदारांचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित होईल. अंब्रेला संस्था बँकिंग क्षेत्रात करण्यात येत असलेल्या नवीनतम सुधारणांची माहिती तसेच म्यूल हंटरसारख्या अनेक आवश्यक सॉफ्टवेअर सुविधा देखील या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. अंब्रेला संस्थेच्या मदतीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करता येतील, जे कर्मचाऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात इतरांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी तसेच जनता आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विश्वास संपादन करण्यासाठी अंब्रेला संस्था मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील सुमारे १,४०० अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांमध्ये सुमारे सहा लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. देशाच्या आर्थिक विकासात या बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. छोटे दुकानदार, व्यापारी, कुटीर उद्योग, एमएसएमई, स्थानिक व्यावसायिक, महिला बचत गट तसेच मध्यमवर्गीयांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी छोट्या कर्जांची आवश्यकता असते. मोठ्या बँकांना अनेकदा या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही; मात्र तालुका पातळीवरील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका ही भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतात. कर्जाची रक्कम जितकी कमी तितकी त्याची परतफेडीची शक्यता अधिक असते. कोणत्याही हमी किंवा तारणाशिवाय कर्ज देण्याची मर्यादा आता अडीच लाख रूपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. या योजनेतील तब्बल ९९.७८ टक्के कर्जांची व्याजासह परतफेड झाली आहे. यावरून छोट्या कर्जदारांची कर्जफेडीची क्षमता स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रात ४४९ सहकारी बँका असून देशातील सहकारी बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये देशातील मोठ्या प्रमाणावर शहरी सहकारी बँका कार्यरत आहेत. त्यामुळे शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अंब्रेला संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे अधिक उपयुक्त ठरेल. देशातील शहरी सहकारी बँकांना 'अम्ब्रेला ऑर्गनायझेशन'च्या माध्यमातून एकत्र आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.



# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे कार्य सामान्य माणसाला दिलासा देणारे

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ कोल्हापूर (दै. संध्या)

शिक्षण, सहकार, उद्योग अशा प्रत्येक क्षेत्रामध्ये पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी प्रचंड मोठे कार्य उभे केले. त्यांनी सामान्य माणसाला दिलासा देण्याचे काम केले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या यशवंत निवासस्थानी भेट देऊन पाटील कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांच्यासोबत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार धनंजय महाडिक, आमदार अशोकराव माने, आमदार राहुल आवाडे, आमदार शिवाजी पाटील उपस्थित होते. यावेळी त्यांनी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यपाल म्हणून पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी तीन राज्यांची जबाबदारी पार पाडली. त्यापूर्वी आमदार तसेच अन्य निरनिराळ्या पदांवर काम करताना प्रत्येक कामात त्यांनी आपला एक ठसा उमटवला. ते केवळ नेते नव्हते, तर ते एक विचारवंत होते. एक कृतार्थ जीवन डी. वाय. दादा जगले. संपूर्ण जीवनाला समृद्ध करेल, असा विचार त्यांच्याकडे होता. त्यांच्या पश्चात त्यांच्या मुलांनी, कुटुंबियांनी अतिशय चांगल्या पद्धतीने त्यांचे विचार जपण्याचे कार्य केले आहे. त्यांच्यासारखे नेते आपल्यातून निघून जाणे ही महाराष्ट्राकरिता मोठी हानी आहे. यावेळी डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष संजय डी. पाटील, आमदार सतेज पाटील, माजी आमदार ऋतुराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### संध्या प्रहार




# महापालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यावर हल्ला



### कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी याचा उपचारा दरम्यान मृत्यू

■ अहिल्यानगर (दै. संध्या)

शहरात एका युवकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली असून शहरात खळबळ उडाली आहे. महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने कुटुंबीयांनी आक्रोश केला. शुक्रवारी संध्याकाळी मुकुंदनगर दर्गा दायरा परिसरात कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी हे पोलचे काम करत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. मुकुंदनगर परिसरातील कबरस्तानमधील विद्युत पोलचे काम सुरू असताना ही घटना घडली होती. तर, हल्ल्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले होते. दरम्यान, गंभीर जखमी धीरज परदेशी याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. कंत्राटी कर्मचारी असलेल्या धीरजवर नेमकं हल्ला का झाला, याचा तपास पोलीस करत आहेत.

या हल्ल्याच्या घटनेनंतर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी काल रात्री फरार मुख्य चार आरोपी युनूस शेख, मेहराज सय्यद,सिराज सय्यद आणि मुस्तकीम सय्यद यांना अटक केली आहे. तर धीरज परदेशी याच्यावर झालेला हल्ला हा कोणत्या करणाने झाला होता, त्याचे नेमकं कारण अद्याप अस्पष्टचं आहे. मात्र, तो हिंदुत्ववादी होता म्हणून त्याला मारण्यात आल्याचा आरोप धीरजच्या पत्नीने केला आहे. तर शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली असून अहिल्यानगरमध्ये हिंदुत्वादी संघटनांकडून बंदचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, माझ्या पतीला ज्या कबरस्थानमध्ये मारहाण झाली, त्या कबरस्थानमध्ये त्यांचा अंतविधी करावा अशी मागणीही मयत धीरज परदेशीच्या पत्नीने रडत रडत केली. या घटनेचं गांभीर्य ओळखून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली जात आहे.

# तुमची जमीन हेच तुमचं अस्तित्व, जमिनी विकू नका

## थेट उद्योगांत पार्टनर व्हा : राज ठाकरेंचे कोकणवासीयांना आवाहन, मुंबई-गोवा महामार्गाची केली पाहणी



### सत्तेतील लोकांना धक्के देण्याची गरज

सध्याच्या राजकीय व्यवस्थेवर आणि कारभारावर टीका करताना राज ठाकरे यांनी 'पालकमंत्री' या संकल्पनेलाच फालतू ठरवले. सध्या पालकमंत्री आणि या सर्व गोष्टी फालतू झाल्या आहेत. निधी येऊनही इथली परिस्थिती बदलत नाही. समस्या सोडवायच्या असतील, तर सत्तेमधील माणसे बदलणे गरजेचे आहे. जोपर्यंत तुम्ही त्यांना धक्के देत नाही, तोपर्यंत तुम्हाला कोणताही बदल दिसणार नाही," असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

■ रायगड/कोकण (दै. संध्या)

मुंबई-गोवा महामार्गाचे काम केवळ राजकीय हस्तक्षेपामुळे रखडले आहे. विकास प्रकल्पांच्या नावाखाली स्थानिकांच्या जमिनी हडप केल्या जात असून, महाराष्ट्रात जमिनी विकण्याचाच धंदा सुरू आहे, असा आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला आहे. राज ठाकरे रायगड दौऱ्यावर असून ते आज मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी करत आहेत. दरम्यान, पत्रकार परिषदेत त्यांनी 'तिसरी मुंबई', कंत्राटदारांची पळापळ आणि कोकणवासीयांचे भवितव्य यावर अत्यंत आक्रमक शब्दांत भाष्य केले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या दुरवस्थेवर संताप व्यक्त करत राज ठाकरे म्हणाले, "राजकीय हस्तक्षेपामुळेच या महामार्गाचे काम रखडले आहे. मागे मी या संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना फोन केला होता. तेव्हा त्यांनी सांगितले होते की, 'कंत्राटदार कंटाळून निघून गेले'. पण माझा सवाल हा आहे की, ते कंत्राटदार कुणामुळे कंटाळले? आज मी नव्याने बांधलेल्या रस्त्यावरून आलो, पण त्याचीही अवस्था अत्यंत वाईट आहे. हा नवीन रस्ताही लवकरच खराब होणार आहे." मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रायगड दौऱ्यादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरील रखडलेल्या माणगाव बायपासच्या कामाची पाहणी केली. या पाहणीपूर्वी मनसे कार्यकर्त्यांनी भव्य बाईक रॅली काढून त्यांचे स्वागत केले. सध्या चर्चेत असलेल्या 'तिसऱ्या मुंबई'च्या प्रकल्पावर त्यांनी मोठे प्रश्नचिन्ह उभे केले. "तिसऱ्या मुंबईसाठी इथे एज्युकेशनल सिटी, मेडिकल सिटी, स्पोर्ट्स सिटी, डेटा सेंटर आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्या आणण्याची चर्चा सुरू आहे. पण हे सर्व महाराष्ट्राला माहीत आहे का? या सगळ्यात आपला इथला शेतकरी आणि जमीनदार हा केवळ 'माजी जमीन मालक' म्हणून उरणार आहे. तो फक्त ही तिसरी मुंबई उभी राहताना बघत राहील आणि बाहेरच्या राज्यांमधून लोक इथे येऊन स्थायिक होतील. शहरं उभी करायची, रस्त्यांची वाट लावायची आणि जमिनी विकायच्या, हाच धंदा महाराष्ट्रात सुरू आहे," अशी टीका राज ठाकरेंनी केली. आपला विकासाला विरोध नाही, मात्र माणसांना अंधारात ठेवू नका, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले. "कोकणात जे प्रकल्प येत आहेत, त्याबद्दल स्थानिकांना काहीच माहिती नाही. जर ही डेव्हलपमेंट स्थानिक लोकांच्या वाट्याला येणार नसेल, तर ती काय कामाची? स्थानिकांच्या जीवावर या गोष्टी उभ्या करायच्या, त्यांच्याकडून जमिनी घ्यायच्या आणि त्यांना उद्ध्वस्त करायचे, हे खपवून घेतले जाणार नाही.

# थोडक्यात...

## कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यामागे बावनकुळे

सोलापूर : दैनिक संध्या

सरकार जसा त्रास मराठा समाजाचे खरे कुणबी प्रमाणपत्र रद्द करून आम्हाला देत आहे, तसाच त्रास त्यांनी मुस्लिम, धनगर, शेतकरी आणि मायक्रो ओबीसी बांधवांनाही दिला आहे. मात्र, हे सरकार आमचे आणि मुस्लिम बांधवांचे काहीच वाकडे करू शकत नाही. आमचे अधिकार रद्द करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला, याचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी द्यावे, असा आक्रमक सवाल मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. माढा येथे आयोजित सभेत बोलताना त्यांनी सत्ताधाऱ्यांवर चौफेर टीका केली. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाचे कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याची चूक चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे, त्यामुळे आम्ही त्यांच्यावरच टीका करणार. उगाच यामध्ये छगन भुजबळ यांना का ओढणार? पण भुजबळांनी चूक केली तर त्यांनाही मी सोडणार नाही. बावनकुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे ऐकून जे करायला नको होते तेच केले. एकनाथ शिंदेंच्या पक्षाच्या संजय शिरसाट यांनी मराठ्यांचे वाटोळे केले.

## आम्हाला नक्की न्याय मिळेल : संजय राऊत

मुंबई : दैनिक संध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिंदे गटाच्या खासदारांना दिलेल्या भेटीवरून आणि देशातील सद्यस्थितीवरून शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनी पुन्हा एकदा केंद्र सरकारवर सडकून टीका केली आहे. "पंतप्रधान मोदी संसदेत येत नाहीत, मात्र त्यांनी गद्दारांसाठी दिल्लीत कॅटरिंग उघडली आहे, असा घणाघात राऊत यांनी केला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांच्या पंतप्रधानांकडील भेटीच्या वेळेबाबतही त्यांनी मोठा खुलासा केला आहे. राज्यातील सत्तासंघर्षावर आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयावर बोट ठेवत संजय राऊत म्हणाले, "गेल्या चार वर्षांपासून शिवसेनेच्या अपात्रतेची सुनावणी प्रलंबित होती, ती आता पक्ष आणि चिन्हाबाबत सुरू झाली आहे.

# बारामती विमानतळावर पुन्हा एकदा विमान अपघात!

## लँडिंग दरम्यान प्रशिक्षण विमान धावपट्टीवरून घसरले : विमान लँडिंगच्या वेळी अत्यंत कमी उंचीवर उडत असताना तांत्रिक बिघाडामुळे अपघात

■ बारामती (दै. संध्या)

बारामती विमानतळावर आज (दि. ९ ऑगस्ट) पुन्हा एकदा विमानाचा अपघात झाल्याची धक्कादायक घटना घडली. लँडिंग करत असताना एका खासगी विमान प्रशिक्षण संस्थेचे विमान धावपट्टीवरून खाली घसरून अपघातग्रस्त झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून दोन्ही वैमानिक बालंबाल बचावले आहेत.

आज दुपारी बारामती विमानतळावर 'कार्व्हर एव्हिएशन' या खासगी कंपनीचे 'सेस्ना १७२' हे प्रशिक्षण विमान लँड करत असताना धावपट्टीवरून खाली घसरले.प्रत्यक्षदर्शींच्या प्राथमिक माहितीनुसार, विमान लँडिंगच्या वेळी अत्यंत कमी उंचीवर उडत असताना त्यात तांत्रिक बिघाड झाला. लँडिंग दरम्यान विमानाचा एक भाग शेजारील लाईटच्या खांबाला धडकला आणि विमान धावपट्टीच्या हद्दीबाहेर जाऊन कोसळले.

या घटनेच्या वेळी विमानात प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी असे दोन जण सवार होते. अपघातात विमानाचे काही प्रमाणात नुकसान झाले असले, तरी दोन्ही वैमानिकांना कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि विमानतळ प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. "कार्व्हर एव्हिएशनच्या सेस्ना १७२ विमानाचे लँडिंग करत असताना अपघात झाला असून ते धावपट्टीवरून घसरले. विमानात दोन व्यक्ती होत्या आणि त्या दोघेही



सुरक्षित आहेत. विमानामध्ये नेमका तांत्रिक बिघाड झाला होता की अन्य काही कारणांमुळे हा अपघात घडला, याचा सखोल तपास पोलीस आणि संबंधित यंत्रणा करत आहेत." अशी माहिती पुण्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी दिली.

बारामती विमानतळावरील या अपघातामुळे सात महिन्यांपूर्वी घडलेल्या भीषण दुर्घटनेच्या कटू आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत. २८ जानेवारी २०२६ रोजी याच बारामती विमानतळावर महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला भीषण अपघात झाला होता. 'व्हीएसआर व्हेंचर्स' कंपनीच्या 'लियरजेट ४५' या चार्टर्ड विमानाचे दुसऱ्यांदा लँडिंग करण्याचा प्रयत्न सुरू असताना झालेल्या या अपघातात अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्दैवी घटनेत अजित पवार, त्यांचे सुरक्षा रक्षक, अटेंडंट आणि दोन वैमानिक (कॅप्टन सुमित कपूर व सह-वैमानिक शांभवी पाठक) यांना प्राण गमवावे लागले होते. बारामती परिसरात 'कार्व्हर एव्हिएशन' आणि 'रेडबर्ड फ्लाईट ट्रेनिंग अकॅडमी' या दोन प्रमुख वैमानिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून तिथे शेकडो विद्यार्थी विमान चालवण्याचे धडे घेतात. मात्र, या प्रशिक्षण केंद्रांच्या विमानांचे वारंवार होणारे अपघात आता गंभीर चिंतेचा विषय बनले आहेत. यापूर्वी १३ मे रोजी 'रेडबर्ड' अकॅडमीच्या एका प्रशिक्षण विमानाचा बारामती विमानतळाजवळील गोजुबावी गावाजवळ सकाळी ८:५० वाजेच्या सुमारास अपघात झाला होता. त्यावेळी सुदैवाने प्रशिक्षणार्थी वैमानिक सुरक्षित बचावला होता.

रेडबर्डच्या विमानांचे यापूर्वीही २ ते ३ वेळा अपघात घडले आहेत. आता कार्व्हर एव्हिएशनच्या विमानाचा अपघात झाल्याने बारामतीमधील प्रशिक्षण विमानांची देखभाल, तांत्रिक दुरुस्ती आणि सुरक्षेच्या मानकांवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

■ मुंबई (दै. संध्या)

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या नेहमीच चर्चेत असतात. हातातून सत्ता गेल्यानंतर त्यांच्या पक्षाला मोठी गळती लागली आहे. अनेक खासदार, आमदारांनी त्यांची साथ सोडली आहे. त्यामुळे पक्षात पुन्हा एकदा नवसंजीवनी यावी यासाठी त्या राज्यभर फिरत आहेत. लोकांशी, स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधत आहेत. दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्यासोबत एक धक्कादायक घटना घडली आहे. उत्तर 24 परगना जिल्ह्यातील हलिशहर येथे दौऱ्यावर असताना बॅनर्जी यांच्या ताफ्यावर लोकांनी हल्ला केला आहे. त्यांच्या कारवर बूट भिरकावण्यात आले आहेत. सोबतच त्यांच्या कारच्या दिशेने चिखलफेकही झाली आहे. या घटनेनंतर बंगालमध्ये एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ममता बॅनर्जी आज (9 ऑगस्ट) उत्तर 24 परगना येथील हलिशहर येथे गेल्या होत्या. यावेळी त्यांच्या ताफ्यावर लोकांनी हल्ला केला. हलिशहर या भागात तृणमूल काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याचा मृत्यू झाला होता. याच कार्यकर्त्याच्या कुटुंबियांची ममता बॅनर्जी भेट घ्यायला गेल्या होत्या. त्याच वेळी संतापलेल्या गर्दीने बॅनर्जी यांना मध्येच आडवले आणि यांच्या ताफ्यावरच हल्ला केला. लोकांच्या गर्दीने ममता बॅनर्जी यांच्या गाडीला चारही बाजूंनी घेरलं. जमलेल्या लोकांनी त्यांच्या गाडीवर चिखलफेक केली. तसेच पाण्याच्या बॉटल, चप्पलही ममता बॅनर्जींच्या गाडीवर भिरकावण्यात आल्या. यावेळी संतापलेल्या लोकांनी ममता बॅनर्जी यांच्याविरोधात नारेबाजी केली.

## संपादकीय

# तैवानची कोंडी

**युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. अनेक देश प्रत्यक्ष युद्ध न छेडता प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणण्याचे नवे मार्ग अवलंबत आहेत. चीनने तैवानच्या पूर्व किनाऱ्यावर नौदलाऐवजी सागरी किनारा रक्षक दलाची गस्त वाढवून याच नव्या युद्धतंत्राचा वापर केला आहे.**

आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील भू-राजकीय नकाशावर तैवानची स्थिती नेहमीच एका धुमसत्या ज्वालामुखीसारखी राहिली आहे. चीनने तैवानला आपल्या मुख्य भूमीचा भाग मानणे आणि तैवानने आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी धडपडणे, हा संघर्ष नवा नाही; मात्र अलीकडच्या काळात या संघर्षाचे स्वरूप कमालीचे बदलले आहे. पारंपरिक युद्धाच्या तोफा डागण्याऐवजी किंवा क्षेपणास्त्रांची थेट धमकी देण्याऐवजी चीनने आता एका अत्यंत छुप्या, चाणाक्ष आणि दीर्घकालीन रणनीतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. या रणनीतीचे ताजे आणि अत्यंत चिंताजनक उदाहरण म्हणजे चीनने तैवानच्या पूर्व किनारपट्टीवर अचानक वाढवलेली सागरी सुरक्षा दलाची गस्त. एकाच महिन्यात दुसऱ्यांदा चीनच्या कोस्ट गार्डने तैवानच्या अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या पूर्व किनारपट्टीवर कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या नावाखाली शक्तिप्रदर्शन केले. वरकरणी ही केवळ नियमित सागरी गस्त वाटू शकते; परंतु जागतिक संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, हा चीनच्या 'ग्रे-झोन वॉरफेयर'चा (धुसर क्षेत्रातील युद्धनीती) एक अत्यंत धोकादायक टप्पा आहे. यात सर्वात मोठा प्रश्न हा निर्माण होतो, की जगातील दुसऱ्या क्रमांकाचे शक्तिशाली नौदल पाठीशी असताना चीनने तैवानला घेरण्यासाठी आपल्या 'कोस्ट गार्ड'ला समोर का केले आहे? यामागे ड्रॅगनची नेमकी कोणती नवी चाल आहे आणि यामुळे आशियातील सुरक्षेचे समीकरण कसे बदलणार आहे, याचा सखोल वेध घेणे गरजेचे आहे. चीन आणि तैवानमधील संघर्षाचा अभ्यास करताना भौगोलिक रचनेला अनन्यसाधारण महत्त्व असते. तैवानच्या पश्चिमेला 'तैवान स्ट्रेट' (Strait) आहे, जी चीनच्या मुख्य भूमीला लागून आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, चीनकडून होणाऱ्या कोणत्याही संभाव्य हल्ल्याचा किंवा घुसखोरीचा धोका हा याच पश्चिम किनारपट्टीला राहिला आहे. साहजिकच, तैवानने आपली बहुतांश लष्करी सज्जता, क्षेपणास्त्र यंत्रणा आणि संरक्षण तटबंदी याच भागात केंद्रित केली आहे. याउलट तैवानची पूर्व किनारपट्टी थेट प्रशांत महासागराकडे उघडते. भौगोलिकदृष्ट्या हा भाग उंच कडे-कपाऱ्यांनी आणि डोंगराळ भूभागाने वेढलेला आहे. त्यामुळे चिनी नौदलाला थेट पूर्व किनाऱ्यावरून तैवानमध्ये प्रवेश करणे नेहमीच कठीण जाणार आहे. आजवर तैवानी लष्करासाठी हा पूर्व किनारा एका सुरक्षित पनाहगाहासारखा राहिला आहे. युद्धजन्य परिस्थितीत तैवानचे नौदलाचे तळ, लढाऊ विमाने आणि लष्करी रसद सुरक्षित ठेवण्यासाठी याच पूर्व किनारपट्टीचा वापर केला जातो; परंतु चीनने आता नेमक्या याच 'सुरक्षित क्षेत्रा'कडे आपली नजर वळवली आहे. पूर्व किनारपट्टीवर 'कोस्ट गार्ड'ची गस्त वाढवून चीनने तैवानला एक स्पष्ट संदेश दिला आहे, की आता त्याच्यासाठी कोणताही कोपरा सुरक्षित राहिलेला नाही. चीन तैवानला केवळ पश्चिमेकडूनच नव्हे, तर पूर्वेकडूनही वेढून पूर्ण नाकेबंदी करण्याचा सराव करत आहे. भविष्यात चीनने तैवानवर थेट लष्करी कारवाई केली, तर पूर्व किनारपट्टीवरूनच अमेरिका, जपान किंवा अन्य पाश्चात्त्य मित्रदेशांकडून तैवानला मदत मिळण्याची सर्वाधिक शक्यता आहे. त्यामुळे या पूर्व किनाऱ्यावर आत्तापासूनच आपले वर्चस्व प्रस्थापित करून, संकटसमयी आंतरराष्ट्रीय मदतीचा मार्ग पूर्णपणे रोखून धरण्याची चीनची ही दीर्घकालीन योजना आहे. चीनने नौदलाच्या विनाशकारी युद्धनौका पाठवण्याऐवजी पांढऱ्या रंगाची, नागरी प्रशासनाशी साधर्म्य सांगणारी 'कोस्ट गार्ड'चीजहाजे का पाठवली, याचे उत्तर 'ग्रे-झोन वॉरफेयर' या संकल्पनेत दडले आहे. लष्करी मुत्सद्देगिरीमध्ये ही अशी स्थिती असते, जी पूर्णपणे शांतताही नसते आणि उघड युद्धही नसते. पांढरा रंग म्हणजे शांतता आणि काळा रंग म्हणजे उघड युद्ध असे मानल्यास, या दोन्हीच्या मधला जो धुसर भाग असतो, त्याला 'ग्रे-झोन' म्हटले जाते. थोडक्यात सांगायचे, तर शत्रूवर एकही गोळी न झाडता, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे थेट उल्लंघन न करता, समोरच्या देशाला मानसिक आणि रणनीतिकदृष्ट्या इतके थकवून सोडायचे की त्याने शेवटी स्वतःहून गुडघे टेकावेत. हीच ही रणनीती आहे.

## उपदेशकथा

### संकटांना तोंड द्या!

भारत भ्रमणाच्या काळात स्वामी विवेकानंद वाराणशीत आले असताना घडलेला हा प्रसंग. दुर्गामातेचे दर्शन घेऊन स्वामीजी परत चालले होते. रस्त्याच्या एका बाजूला पाण्याचा तलाव होता आणि दुसरीकडे एक उंच भिंत होती. स्वामीजी त्या रस्त्याने थोडे पुढे गेले तोच वानरांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. वाराणशीची वानरे दांडगट असतात. स्वामीजी घाबरून पळू लागले पण वानरे आणखी वेगाने त्यांच्या मागे लागली. त्यांच्या पायात आडवी येऊ लागली. चावे घेण्याचा प्रयत्न करू लागली. स्वामीजी पुरते गांगरले. रस्त्याच्या बाजूला बसलेल्या एका साधूने हा प्रकार पाहिला आणि तो स्वामीजींना ओरडून म्हणाला, पळू नका, वानरांकडे तोंड करा! त्यांचे म्हणणे ऐकून स्वामीजी उलटे फिरले आणि वानरांकडे तोंड करून उभे राहिले. त्याबरोबर ती वानरे घाबरून एकदम मागे सरली आणि नंतर पळून गेली. पुढे न्यूयॉर्कमध्ये एका सभेत स्वामीजींना हा प्रसंग सांगितला आणि मग ते म्हणाले, या प्रसंगातून मी आयुष्यातला एक फार मोठा धडा शिकलो, तो म्हणजे संकटांपासून पळून जायचे नाही तर त्यांना तोंड द्यायचे, त्यांच्याशी सामना करायचा?

कथा उपदेश : संकटाला घाबरून न जाता त्याच्याशी सामना करायला शिकले पाहिजे.

## आगामी साप्ताहिकी

१० ऑगस्ट २०२६ सोमवार
नित्यानंद स्वामी पुण्यतिथी – गणेशपुरी
पितांबर महाराज पुण्यतिथी – कोंडोली
संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा दिन
११ ऑगस्ट २०२६ मंगळवार
शिवरात्री
संत सावता माळी पुण्यतिथी
अमावास्या प्रारंभ उ . रात्रौ १.५३
१२ ऑगस्ट २०२६ बुधवार
खग्रास सूर्यग्रहण (भारतातून दिसणार नासल्यामुळे वेधादि नियम पाळू नयेत)
विश्वनाथबाबा फडके पुण्यतिथी – अकोट (अकोला)
दर्श अमावास्या
अमावास्या समाप्ती रात्रौ ११.०६
१३ ऑगस्ट २०२६ गुरुवार
श्रावण मासारंभ
द्वारयात्रा – चिंदवड
बृहस्पती पूजन
आचार्य अत्रे जयंती
अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी (तारेखप्रमाणे)
१४ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
चंद्रदर्शन
जरा – जिवंतिका पूजन
महालक्ष्मी स्थापना पूजन
पत्तेती
१५ ऑगस्ट २०२६ शनिवार
स्वातंत्र्य दिन
पारशी फरवर्दिन मासारंम
अश्वत्तमारुती पूजन
पारशी नूतन वर्ष सन १३९६ प्रारंभ
शनैश्चर शिंगणापूर अभिषेक (श्रावणातील प्रत्येक शानिवारी)
मधुस्त्रवा तृतीया
मुस्लिम रबिलाव मासारंब
१६ ऑगस्ट २०२६ रविवार
विनायक चतुर्थी
नाग – चतुर्थी उपवास
अदित्य पूजन
ऋक हिरण्यकेशी श्रावणी
दूर्वागणपती व्रत

## पंचांग

| | |
|---|---|
| १० ऑगस्ट २०२६ | कृष्ण पक्ष |
| सोमवार | तिथि:द्वादशी ०८:०१:०६ |
| विक्रम संवत्– २०८२ | तिथि:त्रयोदशी २८:५४:२९+ |
| आषाढ शके | नक्षत्र:आर्द्रा १२:२६:३४ |
| संवत्– १९४८ | योग:वज्र २२:२६:१५ |
| संवत्सर –पराभवनाम | करण:तैतिल ०८:०१:०६ |
| अयन– दक्षिणयन | करण:गर १८:२७:३६ |
| मास– आषाढ | करण:वणिज |
| ऋतु– सौर वर्षा | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | 3 | 8 | | | 5 | 9 | |
| 4 | | | | 6 | | 7 | | |
| 9 | | | 4 | | 1 | | 6 | 3 |
| 7 | 4 | 1 | | | | | 8 | |
| 2 | | | | | | | | 9 |
| | 6 | | | | | 4 | 5 | 2 |
| 3 | 2 | | 5 | | 7 | | | 1 |
| | | 4 | | 3 | | | | 7 |
| | 7 | 6 | | | 4 | 9 | | 5 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०३५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 2 | 3 | 7 | 4 | 1 | 8 | 9 | 6 |
| 8 | 1 | 6 | 5 | 2 | 9 | 7 | 3 | 4 |
| 7 | 4 | 9 | 6 | 8 | 3 | 5 | 2 | 1 |
| 4 | 5 | 1 | 9 | 6 | 7 | 2 | 8 | 3 |
| 6 | 7 | 2 | 8 | 3 | 4 | 1 | 5 | 9 |
| 9 | 3 | 8 | 2 | 1 | 5 | 4 | 6 | 7 |
| 3 | 6 | 5 | 4 | 7 | 8 | 9 | 1 | 2 |
| 2 | 9 | 7 | 1 | 5 | 6 | 3 | 4 | 8 |
| 1 | 8 | 4 | 3 | 9 | 2 | 6 | 7 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५१९ – फर्डिनांड मॅगेलन पाच जहाजे घेउन पृथ्वी–प्रदक्षिणेसाठी निघाला.
- १६८० – न्यू मेक्सिकोत पेब्लो क्रांती सुरू.
- १७९२ – फ्रेंच क्रांती – राजा लुई सोळाव्याला अटक.
- १९१३ – दुसरे बाल्कन युद्ध–बुखारेस्टचा तह – युद्धाचा अंत.

### राष्ट्रीय

- १७५८ – मराठी सैन्य अटकेपार पोहोचले.
- १७६३ – माधवराव पेश्वयांच्या सैन्याने राक्षसभुवनच्या लढाईत निजामाचा पराभव केला.
- १९४८ – भारतीय अणू उर्जा आयोगची स्थापना.

### जन्म

- १२६७ – जेम्स दुसरा, अरागॉनचा राजा.
- १३९७ – आल्बर्ट दुसरा, पवित्र रोमन सम्राट.
- १७५५ – नारायणराव पेश्वा.
- १८६० – पंडित विष्णू नारायण भातखंडे, भारतीय संगीतकार, संगीततज्ञ.
- १८५५ – कोल्यापुर दरबारचे प्रसिद्ध गायक अल्ला दियाँ खाँ.
- १८७४ – हर्बर्ट हूवर, अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष.
- १८९४ – भारताचे चौथे राष्ट्रपति वराहगिरी व्यंकटगिरी यांचा जन्म.

### निधन

- १७५९ – फर्डिनांड सहावा, स्पेनचा राजा.
- १९४५ – रॉबर्ट गॉडार्ड, अग्निबाणाचे चनक..
- १९७६ – बर्ट ओल्डफील्ड, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९८० – याह्या खान, पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष.
- २००० – गिल्बर्ट पार्कहाउस, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- २००६ – अनिल कुमार मुझुमदार, माजी आय.ए.एस. अधिकारी.

प्रतिवार्षिक पालन
स्वातंत्र्य दिन – इक्वेडोर.

## : SMS :

Doctor: Tension mat lo.
Patient: Kaise na lu, fees 800 li hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.३ | २३.७ |
| अहमदनगर | ३२.१ | २२.३ |
| अकोला | ३५.५ | २४.५ |
| अमरावती | ३२.८ | २४.४ |
| बीड | ३३.५ | २५ |
| भंडारा | ३७.१ | २५.५ |
| बुलढाणा | ३३.६ | २६.९ |
| चंद्रपूर | ३३.३ | २५.४ |
| चेन्नई | ३९.६ | २९ |
| नवी दिल्ली | ४१.१ | २७.२ |
| धुळे | ३५.७ | २४.९ |
| गोंदिया | ३६.४ | २५.७ |
| जळगाव | ३५ | २४.५ |
| कोल्हापूर | २७.२ | २१.७ |
| लातूर | ३२.१ | २२.४ |
| मुंबई | ३४ | ३१.९ |
| नागपूर | ३६.२ | २४.७ |
| नांदेड | ३४.५ | २४ |
| नंदूरबार | ३२.२ | २५.२ |
| नाशिक | ३०.१ | २२.६ |
| पुणे | २७ | २१.९ |
| पंढरपूर | ३५ | २४.८ |
| सातारा | ३०.८ | २०.८ |
| सांगली | ३१.९ | २२.२ |
| सोलापूर | ३४.९ | २४.५ |
| वर्धा | ३३.४ | २५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

**धनु :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल. सासू–सुनातील दुरावा कमी करा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व तब्येतीची प्रसन्न साथ, घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.


**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. नोकरदारांना नोकरीतील बदल लाभदायक ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर मामा, मावशी किंवा सासुरवाडीचे व्यवहार बिघडू देऊ नका. मुलांच्या वागण्याकडे लक्ष ठेवा.

**कन्या :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा : उत्तर अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

**मीन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील. वृद्धांच्या तब्येती सांभाळा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३६



### आडवे शब्द

१. दुसऱ्यावर अवलंबवून असणे
६. महिरप
९. हिंदीतील सत्य
१०. धाक, वचक
११. रामदासस्वामींचा हा ग्रंथ आधुनिक व्यवस्थापकांनाही उपयोगी
१३. बोहारणीप्रमाणेच याची हाकही लुप्त झालेली दिसते
१६. मुलायम, मऊ
१८. अखंड पडणारी (धार)
१९. बढाई, फुशारकी
२०. नंतर
२१. पैसे देण्यास असमर्थ
२३. बंदुकीच्या फैरी
२५. नातेवाईक
२८. मलई
२९. लहान
३१. फरक, तफावत
३३. अभिनेता (हिंदी)
३५. दरवाजाची झाप
३७. शिकार
३८. गणपती
४०. मोठी नदी
४२. पोळी भाजण्याचे पात्र
४३. अजगर, विट्टीदांडूतील सहा
४४. शोध, माग
४६. वर्षानुवर्षे
४९. रवाळ
५१. अति उंचीचे वर्णन करणारे दोन वृक्ष
५२. शपथ
५३. पैशाचे सन्मानपूर्वक घेतले जाणारे नाव
५५. शहर, गाव
५७. मध
५९. चौकोनी पायऱ्यांनी विहीर
६०. विश्व, दुनिया
६१. चंद्र
६२. हिरवा (हिंदी)
६४. स्थानक
६५. जंगली
६७. हाताचा एक भाग
६९. सांगणे
७०. वन, रान
७१. राजबिंडा
७३. अर्धा 'र'
७५. जळलेला
७७. धनी
७९. अपेक्षाभंग होणे, गंडणे
८१. रचना करणारा
८२. अखेर, उदरभरणाची अखेर
८३. उत्तरेकडील शिवस्थान, विश्वेश्वराची नगरी

### उभे शब्द

१. ट्रेकिंगला मराठी शब्द
२. थोडक्यात राजमान्य राजेश्री
३. मिरवणूक
४. पत्त्यातील सुकामेवा
५. धमनी
६. पुष्परस
७. रड्या मनुष्य
८. कोल्हापूरची देवी
९. शेराला हा कधी तरी भेटतोच
१२. डोंगर पोखरून काढलेला रस्ता
१४. थाप, गप
१५. सततची बडबड (ला.)
१७. निकट, जवळ
२१. नगरासंबंधी
२२. यापेक्षा फळाच्या फोडी खाणे चांगले
२३. आवड, रस
२४. पोते, गोणपाट
२५. नेता, आदर्श
२६. लुच्चा, धूर्त
२७. राजसभा
३०. जेमतेम
३१. काजळ–सुरमा इ.प्रकार
३२. अंगातील मस्ती
३३. पायात चप्पल न घालता
३४. सहाय्य
३६. वाचा, बोलणे
३९. बुद्धाच्या जन्मकथा
४१. कणव, कीव
४३. नौदल
४५. पं.रविशंकर यांचे वाद्य
४६. लहानमोठ्या वस्तू
४७. तक्क्याच्या जोडीचे टेकण
४८. पटकन
५०. गयावाया करणे
५४. शरणागताला दिलेले अभय
५५. दृष्टीभेट
५६. आकाश, नभ
५७. कबरीवरील वास्तु
५८. जाळणे
६३. क्रोध
६६. समीक्षक
६७. चर्चा, खलबत
६८. शेंगेवरील साल
७२. शिल्लक
७४. मान अडकवणारा
७६. संभाव्य संकट, जोखीम
७८. काठ, बाजू
८०. काचेची छोटीशी बाटली

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.पर्वतारोहन ४.कदरदान ८.वाकडा ११.ठेला १२.खसखस १४.मास १५.रखवालदार १८.रेलचेल २०.हातोहात २२.सखी २३.लगत २५.रड २६.जंगल २८.तरू ३०.नाविक ३२.चावी ३४.सलगी ३६.गाज ३८.पाक्षिक ३९.माना ४०.लवण ४१.अंमळ ४२.जनक ४३. मतलब ४५.वाळू ४६.कमला ४८.सन ४९.सरबत ५२.शहारा ५४.वहाण ५५.खोल ५६.जयविजय ५८.कसकस ६०.कवळ ६१.पाव ६२.वसा ६४.पोट ६५.जयजयकार ६७.परवानगी ६९.पीळ ७१.कोट ७२.तांबट ७४.जन पळभार ७७.राज ७८.शव ७९.महाकाली ८०.लग्गा ८१.सहनशीलता

उभे उत्तर : १.पर्वा २.तारणहार ३.हत्यार ४.कलाल ५.रखरखीत ६.दास ७.नखरेल ९.कमाल १०.डास ११.ठेवा १३.सलग १६.खडाजंगी १७.दास १९.चेतना २०.हालचाल २१.तडस २४.हकनाक २७.लगाम २९.रुपाया ३१.विमान ३३.विवर ३५.लज्जत ३७.जळवात ४१.अंबर ४२.जलाशय ४३.मन ४४.लसलस ४७.अवयव ४८.सणक ५०.बळकट ५१.पाय ५३.राणीव ५५.खोक ५६.जळजळ ५७.विराजमान ५९.सणवार ६१.पार ६३.सापट ६६.काजळ ६८.गीतांजली ७०.करदाता ७१.कोमल ७३.टपाल ७४.जवस ७५.पवन ७६.होम ७७.राका

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## भविष्य निर्वाह निधी क्षेत्रीय आयुक्त पुणे यांची भारतीय मजदूर संघ पदाधिकाऱ्यांसह सदिच्छा भेट

**पुणे : दैनिक संध्या**

भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आज कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (EPFO) पुणे येथील क्षेत्रीय भविष्य निर्वाह आयुक्त (Regional Provident Fund Commissioner) श्रीमती पूजा सिंह यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. या भेटीदरम्यान संघटनेच्या प्रतिनिधींनी राज्यातील विविध उद्योग, आस्थापना व कंत्राटी कामगारांशी संबंधित कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) विषयक अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न मांडले. विशेषतः कंत्राटी कामगारांच्या पीएफ कपातीची नियमित अंमलबजावणी, थकीत पीएफ रकमेची वसुली, पीएफ खाते अद्ययावत ठेवणे, यूएएन (UAN) संबंधित अडचणी, निवृत्त व सेवामुक्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित दाव्यांचा तातडीने निपटारा तसेच कामगारांना वेळेत न्याय मिळावा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. श्रीमती पूजा सिंह यांनी भारतीय मजदूर संघाने कामगारांच्या हितासाठी सातत्याने केलेल्या विधायक कार्याची दखल घेत, कर्मचारी हिताच्या प्रकरणांमध्ये कायदेशीर चौकटीत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच EPFO व कामगार संघटनांमध्ये समन्वय वाढवून कामगारांना अधिक सुलभ व परिणामकारक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींनी कामगारांच्या सामाजिक सुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पीएफ कायद्याचे काटेकोर पालन आणि प्रलंबित प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी EPFO प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी विनंती केली. श्रीमती सिंग यांनी.नमुद केले नवीन सामाजिक सुरक्षा कोड व कामगारांचे भविष्य या करिता पुढील कालावधीत जमा असलेली 25% रक्कम सेवानिवृत्त नंतर मिळेल असे नमुद केले. तसेच दंडात्मक कारवाई बाबत विशेष सवलत देण्यात आली आहे. तसेच स्वेच्छापूर्वक पीएफ चे सभासदत्व बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे असे नमूद केले आहे. सौहार्दपूर्ण वातावरणात झालेल्या या सदिच्छा भेटीमुळे कामगारांच्या विविध प्रश्नांच्या निराकरणासाठी भारतीय मजदूर संघ व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना यांच्यातील समन्वय अधिक दृढ होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या प्रसंगी भारतीय मजदूर संघाचे पदाधिकारी, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ सरचिटणीस सचिन मेंगाळे, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ अध्यक्ष निलेश खरात,पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, सेक्रटरी सागर पवार, व पूणे संघटन सचिव उमेश विश्वाद उपस्थित होते. भेटीदरम्यान कामगारांच्या सामाजिक सुरक्षा, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि संघटना-प्रशासन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद राखण्याच्या दृष्टीने पुढील काळातही अशा बैठका आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## वीज कर्मचाऱ्यांनी सुरक्षेला प्राधान्य देत सुरक्षा साधनांचा वापर केलाच पाहिजे : राजेंद्र पवार

**पुणे : दैनिक संध्या**

विजेची कामे करताना वीज कर्मचाऱ्यांना मोठी जोखीम पत्करावी लागते. यासाठी महावितरण प्रशासनाने अत्याधुनिक सुरक्षा साधने उपलब्ध करून दिली असून, प्रत्येक कर्मचाऱ्याने या साधनांचा वापर करणे बंधनकारक आहे. कारण कर्मचारी हाच कंपनीचा खरा कणा असून, त्याच्या सुरक्षिततेची काळजी कंपनी आणि कुटुंबाला सारखीच आहे, असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी आज पुण्यात केले. गणेशखिंड येथील प्रकाशभवन सभागृहात शुक्रवारी (दि. ७) संचालक (मासं) राजेंद्र पवार यांनी मानव संसाधन विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीदरम्यान पुणे परिमंडलातील वीज कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या अत्याधुनिक सुरक्षा साधनांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महावितरणचे मुख्य अभियंता सुनील काकडे, अधीक्षक अभियंते ज्ञानदेव पडळकर, सिंहाजीराव गायकवाड, सुरेश सवाईराम, विजयानंद काळे, सहायक महाव्यवस्थापक सत्यजित राजेशिर्के, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे, समन्वयक डॉ . संतोष पटणी यांच्यासह परिमंडळातील सर्व कार्यकारी अभियंते, मानव संसाधन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना संचालक राजेंद्र पवार म्हणाले, "एखादे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी कितीही दबाव असला तरी सुरक्षेच्या नियमांना कधीही बगल देऊ नका. वीज कोणालाच क्षमा करत नाही, त्यामुळे प्रत्येक कामात सुरक्षा साधनांचा वापर अत्यंत आवश्यक आहे." पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन, उत्तम सुविधा आणि कल्याणकारी योजना राबवून त्यांची काळजी घेते. याच भावनेतून कर्मचाऱ्यांनी देखील ग्राहकांची काळजी घ्यावी, त्यांना तत्पर सेवा द्यावी, ग्राहकांशी संवाद साधताना गोड बोलावे आणि व्यसनांपासून दूर राहावे. कर्मचाऱ्यांच्या कामावरच कंपनीची जनमानसातील प्रतिमा अवलंबून असते, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी मुख्य अभियंता सुनील काकडे यांनीदेखील सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "यापूर्वी स्थानिक पातळीवर सुरक्षा साधने उपलब्ध केली जात होती.

## डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शशिकांत कांबळे यांचा शिवसेनेत प्रवेश

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे: पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी नवी दिल्ली येथे शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. शिवसेना पक्षाचे संसदीय गटनेते व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शशिकांत कांबळे जनहिताचे काम करतील, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला. सामाजिक, पर्यावरणीय तसेच जनहिताच्या विविध विषयांवर पद्मा फाउंडेशनच्या माध्यमातून काम करत असताना समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिक व्यापक स्तरावर काम करण्याची गरज असल्याची भावना श्री. शशिकांत कांबळे यांनी यावेळी व्यक्त केली. पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक व जनहिताच्या विविध उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. “समाजसेवेचा अनुभव आणि जनतेशी असलेला थेट संपर्क याचा उपयोग करून सर्वसामान्य नागरिक, युवक, महिला तसेच पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि जनहितासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे,” असे शशिकांत कांबळे यांनी सांगितले.

# ‘सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध, सुरक्षित महाराष्ट्र’चा संदेश द्यावा

### राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे ; अभेद्य वाद्य पथकातर्फे तुकाराम मुंढे यांना आणि त्यांच्या कार्याला मानवंदना

■ पुणे (दै. संध्या)

वाद्यपथकातील वादक अनेकदा तळलेले पदार्थ तसेच एनर्जी ड्रिंकचे सेवन करतात. हे टाळून सकस आहार घ्यावा. शक्य असल्यास घरचा डबा सोबत न्यावा. परवानाधारक विक्रेत्यांकडून खाद्यपदार्थ घ्यावे. गणेशाची भक्ती करताना स्वतःची शक्ती कमी होऊ देऊ नका. तसेच दरवर्षी गणेशोत्सवात वाद्यपथकांकडून समाजाला संदेश दिला जातो. यंदा सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध, सुरक्षित महाराष्ट्र हा संदेश द्या. सक्षम महाराष्ट्र घडवायचा असेल तर तो सुरक्षित झाल्याशिवाय बनणार नाही, असे मत राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी व्यक्त केले.




अभेद्य वाद्यपथक, कलावंत वाद्यपथक, ढोल ताशा महासंघ महाराष्ट्र आणि नू.म.वि. प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रास्त्यावरील नू.म. वि. प्रशालेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ढोल ताशा महासंघ महाराष्ट्रचे अध्यक्ष पराग ठाकूर, नगरसेवक भारत भूषण बराटे, अभेद्य वाद्य पथकाचे अध्यक्ष रोहन जोशी, सौरभ गुजर, दीपा कुलकर्णी, कलावंत वाद्य पथकाचे सौरभ गोखले, भूषण ताकवले आदी उपस्थित होते. यावेळी वादकांनी वादनातून तुकाराम मुंढे यांच्या कार्याला मानवंदना दिली.

तुकाराम मुंढे म्हणाले, गणेशोत्सवात प्रसाद म्हणून पेढे, लाडू आदी पदार्थांचे वाटप केले जाते. मात्र, हा प्रसाद सुरक्षित आहे का, हा प्रश्न विचारण्याची गरज आहे. नागरिकांना सुरक्षित अन्न देणे ही माझी भूमिका असून त्यामध्ये कोणतीही तडजोड होता कामा नये. गणेशोत्सवही याला अपवाद असू शकत नाही. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनी अन्नाच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी. अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. गणेशोत्सव मंडळांमध्ये येणाऱ्या प्रत्येक भक्ताला सुरक्षितपणे घरी पाठविण्याची जबाबदारी आपली आहे.

ते पुढे म्हणाले, भारताला महासत्ता बनविण्यासाठी केवळ आर्थिक शक्ती पुरेशी नाही. केवळ शारीरिक नव्हे, तर वैचारिक अभेद्यताही निर्माण करणे आवश्यक आहे. आर्थिक, सामाजिक आणि वैचारिकदृष्ट्या सक्षम भारत घडविण्यासाठी प्रत्येकाने आपली भूमिका पार पाडली पाहिजे. यशस्वी होण्यासाठी शिस्त हे सर्वात चांगले हत्यार आहे. ही अत्यंत चांगली गोष्ट वाद्यपथकांमध्ये आहे. कोणत्याही देशाचे भविष्य तरुणाईवरती तरुणाईच्या विचारांवर असते आणि या वाद्यपथकांनी निःस्वार्थपणे सामाजिक कार्य केले आहे, हे वाखाणण्याजोगे आहे.

## Q1 मध्ये महसूल 10.9% वाढून 2,510 कोटींवर

■ पुणे (दै. संध्या)

गुरुग्राम, 6 ऑगस्ट 2026: भारती हेक्साकॉम लिमिटेडने (Bharti Hexacom) 30 जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीचे (Q1’27) ऑडिटेड आर्थिक निकाल जाहीर केले. या तिमाहीत कंपनीचा एकूण महसूल 2,510 कोटी रुपयांवर पोहोचला. हा महसूल गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत 10.9% आणि मागील तिमाहीच्या तुलनेत 4% अधिक आहे. मोबाईल सेवांमधून मिळणाऱ्या महसुलातही वर्षभरात 9.3% वाढ झाली. अधिक ग्राहकांनी चांगल्या प्लॅनची निवड केल्यामुळे आणि विद्यमान ग्राहक कंपनीसोबत कायम राहिल्यामुळे ही वाढ झाली आहे.

Q1'27 मध्ये प्रति ग्राहक सरासरी महसूल (ARPU) 259 रुपयांवर पोहोचला. गेल्या वर्षी याच तिमाहीत तो 246 रुपये होता. स्मार्टफोन डेटा वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या सातत्याने वाढत असून, गेल्या एका वर्षात कंपनीने 13 लाख नवीन स्मार्टफोन डेटा ग्राहक जोडले आहेत. त्यामुळे या ग्राहकवर्गात वार्षिक 6% वाढ झाली आहे.

या तिमाहीत मोबाईल डेटा वापर 2,381 पेटाबाइट (PB) इतका झाला, जो गेल्या वर्षीच्या तुलनेत 30.5% अधिक आहे. ग्राहकांना अधिक वेगवान आणि चांगला डिजिटल अनुभव देण्यासाठी कंपनीने 5G नेटवर्क स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित 'पोस्टपेड फास्ट लेन' सेवा सुरू केली आहे. तसेच नेटवर्कची गुणवत्ता आणि कव्हरेज वाढवण्यासाठी कंपनीने गेल्या एका वर्षात 399 नवीन टॉवर्स उभारले आहेत. कंपनीच्या होम्स, ऑफिस आणि इतर सेवा विभागानेही चांगली वाढ नोंदवली आहे. या विभागाचा महसूल गेल्या वर्षीच्या तुलनेत 61.4% वाढला आहे. वाय-फाय आणि आयपीटीव्ही सेवांची वाढती मागणी लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर नवीन ग्राहक जोडले गेले आहेत. या विभागातील ग्राहकांची संख्या आता 9 लाखांवर पोहोचली आहे.

## कितीही मोठे झालात, तरी अभ्यास करणे सोडू नका : ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत

■ पुणे (दै. संध्या)

अंतःकरणाची चित्तवृत्ती एकाच ठिकाणी लागून राहणे, यालाच अभ्यास म्हणतात. तो एकाएकी साध्य होत नाही; त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. जे जलद गतीने येते, ते जलद गतीने निघून जाते; परंतु अभ्यासाने मिळालेले ज्ञान दूरपर्यंत टिकून राहते. त्यामुळे सातत्याने अभ्यास केला पाहिजे. भजनाचा, श्रवणाचा आणि ज्ञानसंपादनाचा अभ्यास करून भगवंतापर्यंत पोहोचले पाहिजे. आपण कितीही मोठे झालो, तरी अभ्यास करणे कधीही सोडू नये, असे प्रतिपादन डोंबिवली येथील श्रीमलंग गड येथील ऑनलाईन कीर्तन गुरुकुलाचे संस्थापक ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत यांनी केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सेंट्रल पार्क येथे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



रविवार, दि. ९ ऑगस्ट पर्यंत हा महोत्सव सुरु असून दररोज सायंकाळी ५.३० वाजता महाराष्ट्राच्या विविध भागांतील नामवंत कीर्तनकारांना ऐकण्याची व यामाध्यमातून स्वरब्रह्माची अनुभूती घेण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे.

ह.भ.प. जयेश महाराज भाग्यवंत म्हणाले, अभ्यासानेच आपल्याला यशापर्यंत पोहोचता येते. अभ्यासाशिवाय यश प्राप्त होऊ शकत नाही. यशाच्या उच्च शिखरावर पोहोचलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या पाठीशी अभ्यास आणि अनुभव असतो. पारायणाची पद्धतही सातत्याने अभ्यास करण्याची शिकवण देते. तुकोबारायांच्या अभंगातूनही अभ्यासाचे महत्त्व सांगितले आहे. ते पुढे म्हणाले, वाघ आणि सापासारख्या प्राण्यांवरही प्रेमाने विजय मिळवता येतो. योग, विवेक आणि ज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी कष्ट करावे लागतात. मात्र भक्त बनण्यासाठी, पाईक बनण्यासाठी किंवा दास बनण्यासाठी कष्ट करावे लागत नाहीत.

## शंभरी ओलांडलेल्या स्वातंत्र्यसैनिकाच्या वीरपत्नीचा पुण्यात सन्मान सोहळा



■ स.प. महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या आणि आज १०१ व्या वर्षी तब्बल चार पिढ्या पाहिलेल्या शामला गुप्ते यांचा सन्मान गणेशोत्सव मंडळांनी देखील केला. सन १९७२ च्या दुष्काळात रेशनवर धान्य आणून केलेला संसार आणि जुने पुणे पाहिलेल्या शामला गुप्ते यांनी उपस्थितांना आशीर्वाद देत निरोगी आरोग्याचा मंत्र देखील दिला.

■ पुणे (दै. संध्या)

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात कर्नाटकमधून सहभाग घेणाऱ्या आणि कालांतराने पुण्यात वास्तव्यास असलेले स्वातंत्र्यसैनिक विश्वनाथ गुप्ते यांच्या वीरपत्नी शामला गुप्ते यांनी नुकतीच वयाची शंभरी पूर्ण केली. शंभरी ओलांडलेल्या स्वातंत्र्यसैनिकाच्या वीरपत्नीचा हा सन्मान विधायक पुणे या गणेशोत्सव मंडळाच्या व्यासपीठातर्फे करण्यात आला. विशेष म्हणजे पुणे सिटी पोस्ट च्या 'माय स्टॅम्प' या संकल्पनेप्रमाणे शामला गुप्ते यांचे छायाचित्र तिकिट प्रदर्शित करून त्यांच्या कार्याचा गौरव टपाल खात्याने केला. विधायक पुणे आणि गुप्ते परिवार यांच्या वतीने शामला गुप्ते यांच्या 'शंभरी' चा कार्यक्रम आपटे रस्त्यावरील श्रेयस हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुणे सिटी पोस्टाचे सिनियर पोस्ट मास्तर विलास घुले, सुरेंद्र तापकीर, सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, विष्णू ठाकूर, मिलिंद गुप्ते, मोनिका गुप्ते यांसह गुप्ते परिवार आणि विविध गणेशोत्सव मंडळांचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. त्याकाळी स.प. महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या आणि आज १०१ व्या वर्षी तब्बल चार पिढ्या पाहिलेल्या शामला गुप्ते यांचा सन्मान गणेशोत्सव मंडळांनी देखील केला. सन १९७२ च्या दुष्काळात रेशनवर धान्य आणून केलेला संसार आणि जुने पुणे पाहिलेल्या शामला गुप्ते यांनी उपस्थितांना आशीर्वाद देत निरोगी आरोग्याचा मंत्र देखील दिला. यावेळी त्यांची धान्यातुला करण्यात आली. हे १०१ किलो धान्य आपलं घर या संस्थेला देण्यात आले.

## प्रसिद्ध अभिनेत्री उषा बचानी यांची सोनी सबच्या यादें मालिकेत एन्ट्री

■ पुणे (दै. संध्या)

सोनी सबचं यादें आपल्या प्रेक्षकांना विनोद आणि आकर्षक वैद्यकीय प्रकरणांच्या अनोख्या मिश्रणाने आनंदित करत आहे. डॉ. देव मेहता (इक्बाल खान) यांचं आयुष्य बदलत्या नात्यांमुळे आणि अनपेक्षित वळणांमुळे अधिक गुंतागुंतीचं होत असताना, कथेत आणखी एक भावनिक स्तर जोडण्यासाठी एक नवीन पात्राची एन्ट्री होणार आहे.

कथेत आता ज्येष्ठ अभिनेत्री उषा बचानी प्रवेश करत आहेत, त्या वार्तिका म्हणून दिसतील, ज्यांना प्रेमाने आई साहेब म्हणून ओळखलं जातं. त्या डिग्गी (अर्जुन पुंज) यांच्या आई असून, मजबूत मूल्यं, अढळ तत्त्वं आणि शांत पण प्रभावी उपस्थिती असलेली एक सुसंस्कृत स्त्री आहेत. परंपरेशी घट्ट जोडलेल्या आणि आपल्या मराठी वारशाचा अभिमान बाळगणाऱ्या वार्तिका यांचा विश्वास आहे की एखाद्या व्यक्तीचा खरा स्वभाव हा रोजच्या कृतीतून दिसून येतो, मोठ्या दिखाव्यांतून नव्हे. शांत आणि न्यायी असलेल्या त्या प्रामाणिकपणा, आदर आणि सातत्याला सर्वांत महत्त्व देतात. आपल्या मुलगा दिग्विजयसोबतचं त्यांचं घट्ट नातं आणि त्यांचे ठाम विचार कथेला ऊब, भावना आणि रोचक क्षणांची भर घालण्याचं आश्वासन देतात. त्यांना आपल्या सुनेबद्दलही मोठ्या अपेक्षा आहेत. दिग्विजय आणि डॉ. सृष्टि (गुलकी जोशी) लग्न करून आयुष्याचा नवा अध्याय सुरू करण्याच्या तयारीत असताना, वार्तिकाचा प्रवेश त्यांच्या जीवनात एक ताजं आणि आकर्षक नातं आणणार आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना या नात्यांचा पुढील प्रवास पाहण्याची उत्सुकता लागली आहे. आपल्या व्यक्तिरेखे बद्दल बोलताना उषा बचानी यांनी सांगितलं, “जेव्हा मी प्रथम वार्तिकाबद्दल वाचलं, तेव्हा तिच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाने आणि शांत अधिकाराने मला त्वरित आकर्षित केलं. तिचं व्यक्तिमत्त्व आणि रूप दोन्ही अत्यंत देखणं आणि वेगळं आहे. ती परंपरेला महत्त्व देणारी स्त्री आहे.

## कलाकारवर्ग ॲक्शनने भरलेल्या शूटदरम्यान चहा-पकोड्यांच्या गप्पा रंगवतो

■ पुणे (दै. संध्या)

सोनी सबवरील हस्तिनापुर के वीर पांडव आणि कौरवांच्या न सांगितलेल्या बालपणीच्या वर्षांना जिवंत करतं, त्यांच्या प्रवासाला आकार देणाऱ्या मूल्यं, नातेसंबंध आणि अनुभवांना पकडतं. कलाकार एकत्र काम करताना वेळ घालवतात, पण शूटिंगदरम्यानच्या साध्या क्षणांमुळे सेटवरील त्यांचा वेळ आणखी संस्मरणीय बनतो.

अलीकडेच कलाकारांनी त्यांच्या व्यस्त शूटिंग वेळापत्रकातून एक ताजेतवाने ब्रेक घेतला आणि एकत्र चहा आणि पकोडा पार्टीचा आनंद लुटला. लहान कलाकारांपासून ते ज्येष्ठ कलाकारांपर्यंत सगळेच गरमागरम चहा, खमंग पकोडे आणि अखंड गप्पांमध्ये रमले. एका छोट्या ब्रेकने मजेशीर बंध निर्माण करणाऱ्या सत्राचं रूप घेतलं. उर्वा सावालिया, जी अर्जुनची भूमिका साकारते, यांनी सांगितले, “मी नेहमी आमच्या चहा ब्रेकची वाट पाहते कारण त्याच वेळी सगळे एकत्र येतात. आम्ही बसतो, पकोडे खातो, शूटिंगदरम्यान घडलेल्या मजेदार गोष्टींवर हसतो आणि कधी कधी खेळही खेळतो. हे मित्रांसोबतच्या पिकनिकसारखं वाटतं आणि अशा क्षणांमुळे शूटिंग आणखी मजेदार होतं.” अथर खान, जो युधिष्ठिरची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, “शूटिंग नेहमीच रोमांचक असते, पण आमचे स्नॅक ब्रेक्स तिला आणखी खास बनवतात. आम्ही सगळे स्नॅक्सची वाट पाहतो आणि खाणं संपेपर्यंत इतकं हसतो की पुन्हा सीनकडे परतताना ताजेतवाने वाटतं. ही छोटीशी गोष्ट आहे.



दैनिक संध्या — नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे

### चोरी करण्यासाठी स्वयंपाक्याने रचला हत्येचा कट; पाच जण गजाआड

**मुंबई : दैनिक संध्या**



जुहू पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरक्षा रक्षकाची हत्या करून व्यापारी कुटुंबातील तिघांची हत्या तसेच घरातील रोख रक्कम व दागिने लुटण्याचा कट रचल्याप्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. या कटाचा मुख्य सूत्रधार व व्यापारी कुटुंबाकडे स्वयंपाकी म्हणून काम करणारा जोगेश्वर उदन मल्लिक ऊर्फ किशन असल्याचे तपासात उघड झाले आहे. हा कट मागील सुमारे दोन वर्षांपासून आखला जात असल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका निवासी इमारतीतील व्यापाऱ्याच्या घरात लूट करण्याच्या उद्देशाने आरोपी आले होते. यावेळी इमारतीचा सुरक्षा रक्षक मनोजकुमार यादव (३८) याला मारहाण करून कापडी दोरीने गळा आवळून त्याची हत्या करण्यात आली. ही घटना २ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२:४० ते पहाटे ४ वाजताच्या दरम्यान घडली होती. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह इमारतीच्या पाण्याच्या टाकीत फेकून देण्यात आला होता.

### 'एफडीए' कारवाईमुळे अनेकांचा उडाला रंग; भेसळ रोखण्यासाठी एफडीए ॲक्शन मोडवर

**कोल्हापूर : दैनिक संध्या**



मुंबई : साखरेला नैसर्गिक आणि आरोग्यदायी पर्याय म्हणून गुळाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. मात्र, गुळाला आकर्षक पिवळसर किंवा पांढरट रंग आणण्यासाठी काही उत्पादकांकडून सोडियम हायड्रोसल्फाइट (हायड्रोस), तसेच इतर रसायनांचा बेकायदेशीर वापर होत असल्याचे अन्न व औषध प्रशासन (एफडीए)च्या तपासणीत समोर आले आहे. त्यानंतर राज्यभरात 'एफडीए'ने छापेमारी आणि नमुना तपासणीची मोहीम सुरू केली. या कारवाईचा परिणाम म्हणून अनेक बाजारपेठांमध्ये पूर्वी मोठ्या प्रमाणावर दिसणारा पिवळा गूळ जवळपास गायब झाला असून, नैसर्गिक तपकिरी रंगाचा गूळच विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे चित्र आहे. कारवाईनंतर अनेक उत्पादकांनी रसायनयुक्त गूळ बाजारात आणणे टाळले आहे. काही ठिकाणी गुळाची आवकही घटली असून, प्रयोगशाळेच्या तपासणीनंतरच माल विक्रीसाठी पाठविण्याची खबरदारी घेतली जात आहे. 'एफडीए'ने ग्राहकांनीही रंगाऐवजी दर्जा आणि सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले आहे. गुळाच्या गोडव्यातही भेसळीचा गैरप्रकार उघड झाला आहे. वजन आणि नफा वाढविण्यासाठी साखर, स्टार्च किंवा इतर घटकांची भेसळ केली जात असल्याचे समोर आले. गुळातील भेसळीमुळे आरोग्याच्या गंभीर समस्या होतात. त्यात पोटदुखी, मळमळ, उलट्या, यकृत व मूत्रपिंडांवर दुष्परिणाम, श्वसनाचे त्रास, त्वचेची ॲलर्जी यांचा समावेश आहे. दीर्घकाळ सेवन केल्यास गंभीर धोके उद्भवण्याची भीती असते. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, अहमदनगर, पुणे आदी ठिकाणी राज्यातील विविध जिल्ह्यांत गुळाचा पुरवठा केला जातो. नैसर्गिक गुळाचा रंग साधारण तपकिरी ते गडद तपकिरी असतो. अतिशय चमकदार पिवळा किंवा पांढरट रंग संशयास्पद असतो. रासायनिक वास किंवा अनैसर्गिक चकाकी असल्यास खरेदी टाळावी. संशयास्पद गुळाबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या जिल्हा कार्यालयात किंवा अन्न सुरक्षा हेल्पलाइनवर तक्रार करता येते. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत भेसळयुक्त अन्न विक्री केल्यास उत्पादन जप्त करणे, परवाना निलंबित किंवा रद्द करणे, आर्थिक दंड, तसेच गंभीर प्रकरणांमध्ये फौजदारी कारवाईची तरतूद आहे. दोषाच्या स्वरूपानुसार लाखो रुपयांपर्यंत दंड आणि शिक्षाही होऊ शकते. 'एफडीए'च्या कारवाईनंतर ग्राहकही नैसर्गिक रंगाच्या गुळालाच पसंती देत आहेत.कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, अहमदनगर, पुणे आदी ठिकाणी राज्यातील विविध जिल्ह्यांत गुळाचा पुरवठा केला जातो. नैसर्गिक गुळाचा रंग साधारण तपकिरी ते गडद तपकिरी असतो. अतिशय चमकदार पिवळा किंवा पांढरट रंग संशयास्पद असतो. रासायनिक वास किंवा अनैसर्गिक चकाकी असल्यास खरेदी टाळावी.



### घरात कासव, घुबड, पोपट पाळताय?

**मुंबई : दैनिक संध्या**

महाराष्ट्रासह मुंबई महानगरात भारतीय तसेच विदेशी वन्यजिवांच्या व्यापारात सातत्याने वाढ होत आहे. साप, कासवे, सरडे, पक्षी, घुबड, माकडे तसेच इतर दुर्मीळ प्रजातींचे प्राणी पाळीव प्राणी म्हणून किंवा आर्थिक फायद्यासाठी विक्रीसाठी ठेवले जात असल्याची अनेक प्रकरणे समोर येत आहेत. हा व्यापार केवळ कायद्याचे उल्लंघन नसून, जैवविविधता आणि पर्यावरणासाठी धोका आहे, असे वन्यजीव मित्रांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांनी व्यवहारांबाबत विशेष सतर्क राहणे आवश्यक आहे. वन्यजिवांची तस्करी केवळ दुर्मीळ प्रजातींच्या विक्रीपुरती मर्यादित नाही, तर त्यामागे अंधश्रद्धा, आर्थिक लाभ आणि पाळीव प्राणी ठेवण्याची वाढती हौस ही कारणे आहेत. कासवे घरात ठेवल्याने धन, समृद्धी व शुभ लाभ होतो, या चुकीच्या समजुतीमुळे त्यांची विक्री केली जाते. पोपट व इतर पक्षी बोलण्याच्या क्षमतेमुळे पिंजऱ्यात ठेवण्यासाठी विकले जातात, तर साप, सरडे आणि विदेशी प्राणी हे वेगळेपण दाखविण्याची हौस किंवा सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्यासाठी पाळले जातात. या सर्व प्रकारांमुळे वन्यजिवांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासापासून दूर केले जाते. अनेकांचा असा गैरसमज असतो की विदेशी (एक्झॉटिक) वन्यजिवांवर कोणतेही कायदे लागू होत नाहीत. प्रत्यक्षात विदेशी वन्यजिवांच्या आयात, ताबा, विक्री "" किंवा हस्तांतरणासाठी शासनाने निश्चित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. आवश्यक नोंदणी, वैध कागदपत्रे किंवा अधिकृत परवानग्या नसल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ तसेच लागू असलेल्या इतर कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई होऊ शकते. वन्यजिवांच्या बेकायदेशीर तस्करीदरम्यान प्राण्यांना अमानुष छळ व प्रचंड वेदना सहन कराव्या लागतात. तस्करांकडून त्यांना लहान पिशव्या, टोपल्या, बॉक्स किंवा अत्यंत अरुंद जागेत कोंबून वाहतूक केली जाते. त्यामुळे अनेक प्राण्यांचा प्रवासादरम्यान मृत्यू होतो, तर अनेक गंभीर जखमी होऊन कायमचे अपंग होतात. अशा प्रकारची अमानुष वागणूक ही प्राणी क्रूरता प्रतिबंध अधिनियम, १९६० अंतर्गत दंडनीय अपराध आहे. नागरिकांनी काय करावे? वन्यजिवांची संशयास्पद विक्री दिसल्यास त्यांची खरेदी करू नये, विक्रेत्याशी वाद घालू नये. संशयास्पद प्रकरणाची माहिती वन विभाग, जवळच्या वन परिक्षेत्र कार्यालय, पोलिसांना द्यावी.

# E20 पेट्रोलमध्ये ५०० पीपीएम क्लोराइड आढळल्याच्या दाव्याला पुष्टी नाही

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

E20 पेट्रोलमधील आर्द्रता आणि क्लोराइडच्या उपस्थितीबाबत अलीकडे प्रसारित झालेल्या वृत्तांच्या पार्श्वभूमीवर तेल विपणन कंपन्यांनी देशभरातील संपूर्ण पुरवठा साखळीची अतिरिक्त आणि व्यापक तपासणी केली. या तपासण्यांमध्ये E20 पेट्रोलची गुणवत्ता निर्धारित मानकांच्या मर्यादेत असल्याचे आढळून आले असून, इंधन दूषित झाल्यामुळे ग्राहकांनी चिंता करण्याचे कारण नसल्याचे कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. तेल विपणन कंपन्यांच्या म्हणण्यानुसार, रिफायनरीज, डिस्टिलरीज, डेपो, टर्मिनल्स आणि किरकोळ विक्री केंद्रे अशा पुरवठा साखळीतील विविध टप्प्यांवर क्लोराइडची तपासणी करण्यात आली. यादृच्छिक पद्धतीने करण्यात आलेल्या तपासण्यांमधून इंधनाच्या गुणवत्तेत कोणतीही मोठी तफावत आढळली नसल्याचे सांगण्यात आले. रिफायनरीजमधून घेण्यात आलेल्या १०० हून अधिक पेट्रोल नमुन्यांमध्ये क्लोराइडचे

**तेल कंपन्यांची तपासणी**

प्रमाण १ पीपीएम किंवा त्यापेक्षा कमी आढळले. तसेच, गेल्या दहा दिवसांत देशभरातील ८० डिस्टिलरीजमधून घेण्यात आलेल्या इथेनॉलच्या नमुन्यांमध्ये क्लोराइडचे प्रमाण ३ पीपीएमपेक्षा कमी आढळले. डेपो आणि टर्मिनल्समधून तपासण्यात आलेल्या E20 आणि इथेनॉलच्या ८० हून अधिक नमुन्यांमध्येही क्लोराइडचे प्रमाण ३ पीपीएमपेक्षा कमी असल्याचे कंपन्यांनी स्पष्ट केले आहे.

तपासणीदरम्यान केवळ चार स्वतंत्र प्रकरणांमध्ये क्लोराइडचे प्रमाण वाढलेले आढळले. या चारही ठिकाणी इंधनाचा पुरवठा तात्काळ थांबविण्यात आला. त्यानंतर समस्येच्या मूळ कारणाचा शोध घेऊन आवश्यक सुधारात्मक उपाययोजना करण्यात आल्या आणि त्यानंतरच पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला. पेट्रोलमध्ये पाणी मिसळण्याच्या शक्यतेबाबतही तेल कंपन्यांनी देखरेख वाढवली आहे. देशभरातील सुमारे ९० हजार किरकोळ विक्री केंद्रांवरील भूमिगत साठवण टाक्यांची अनिवार्य तपासणी सुरू करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रावर दररोज ८ ते १२ वेळा पाणी शिरण्याची शक्यता आणि इंधनाची घनता तपासली जात असल्याचे कंपन्यांनी सांगितले.

**किरकोळ विक्री केंद्रांवरील तपासणी वाढवली :** वाढीव तपासणी मोहिमेत आतापर्यंत १,००० हून अधिक नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी गेल्या काही दिवसांतील १६० तपासणी अहवालांच्या विश्लेषणात क्लोराइडचे प्रमाण ० ते ३ पीपीएम दरम्यान असल्याचे आढळले. त्यामुळे E20 पेट्रोलमध्ये शेकडो पीपीएम किंवा ५०० पीपीएम क्लोराइड असल्याच्या दाव्यांना तपासणीतून पुष्टी मिळत नसल्याचे तेल कंपन्यांनी म्हटले आहे.



## खडकुंबे शाळेत रंगली लोकशाहीची रियल निवडणूक

■ जुन्नर (दै. संध्या)

खडकुंबे शाळेतील विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार, निवडणूक प्रक्रिया आणि नागरिक म्हणून जबाबदाऱ्यांची प्रत्यक्ष ओळख व्हावी या उद्देशाने खडकुंबे तालुका जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा खडकुंबे मध्ये लोकशाही निवडणूक प्रक्रियेचे वास्तवदर्शी प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या निवडणुकीत शाळेच्या मुख्यमंत्रीपदी श्रेयस रामदास सरोगदे आणि उपमुख्यमंत्री पदी रुद्र तानाजी मुकणे निवडून आले. या निवडणुकीत एकूण दहा विद्यार्थी उमेदवार उभे होते. त्यांना मोटार गाडी, नारळ, रिक्षा, सायकल, चेंडू, पंखा, कुकर, वाघ आंबा,कपबशी इत्यादी चिन्हे देण्यात आली होती. विद्यार्थ्यांना निवडणूक अर्ज भरणे, आचारसंहिता, प्रचार, निवडणूक अर्ज माघार घेणे, अभिरूप मतदान इत्यादी मतदानासंबंधी माहिती देण्यात आली होती. प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणेच ईव्हीएम मशीनवर (बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट) मतदान प्रणालीचा वापर करून गुप्त मतदान घेण्यात आले. मतदान यंत्रावर नोटाचे बटनही उपलब्ध करून देण्यात आले होते. मतदान संपताच तत्काळ मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात आला.

## ज्ञानवर्धिनी विद्यालयात आदिवासी दिन दिमाखात साजरा



■ चाकण (दै. संध्या)

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल तसेच स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालयात क्रांती दिन व आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी यावेळी विविध क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक तसेच आदिवासी समाजातील थोर व्यक्तिमत्त्वांची वेशभूषा साकारून त्यांच्या कार्याला अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्या आकर्षक वेशभूषेमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली होती.

विकास गोरे यावेळी म्हणाले, "दि. ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनाची सुरुवात झाली. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेला भारत छोडोचा नारा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. तसेच आदिवासी समाजाच्या स्वातंत्र्य लढ्यातील बिरसा मुंडा यांचे कार्य गौरवास्पद आहे."

## चोरडिया यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थिनींना छत्र्यांचे वाटप

■ पुणे (दै. संध्या)

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या मालिकेअंतर्गत पुण्यातील 'आदर्श विद्यालय' प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पावसाळ्यातील सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला हातभार लावण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि समाजहिताची जाणीव जोपासत विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करणे आणि समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमावेळी आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा लांजेवार, शाळेतील सर्व शिक्षिका, तसेच राम घायतिडक (पाटील), पुणे जिल्हा सरचिटणीस प्रदीप घाडगे, नरसिंग भंडारी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत 'सूर्यदत्त'चे आभार मानले.



प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त '६५ वर्षे - ६५ समाजोपयोगी उपक्रम' या संकल्पनेतून 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनात अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास या क्षेत्रांमध्ये सकारात्मक योगदान देण्याचा सूर्यदत्तचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, म्हणाले, "वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून, समाजाप्रती आपली जबाबदारी अधिक दृढ करण्याची संधी असते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलविणे, त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासात छोटासा का होईना हातभार लावणे, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट आहे. समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षण, संस्कार आणि सेवाभाव या त्रिसूत्रीच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, हीच सूर्यदत्तची भूमिका आहे."

सुषमा चोरडिया म्हणाल्या, "मुलींचे शिक्षण, सुरक्षितता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप हा उपक्रम मुलींना त्यांच्या शिक्षणप्रवासात समाज त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, हा विश्वास देण्याचा प्रयत्न आहे. समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन सातत्याने कार्यरत राहील."

## या स्वातंत्र्यदिनी पहा 'भारत भाग्य विधाता'

### २६/११च्या हल्ल्यात धैर्याने उभ्या राहिलेल्या पडद्यामागच्या नायकांची कहाणी

■ मुंबई (दै. संध्या)

२६/११च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यादरम्यान स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी धैर्याने उभ्या राहिलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांची आजवर न सांगितलेली कहाणी आता रुपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे. कंगना रणौत, गिरिजा ओक आणि स्मिता तांबे यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, १४ ऑगस्ट २०२६ रोजी हिंदी झी५वर प्रदर्शित होणार आहे.




मनोज तापडिया लिखित आणि दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती पेन स्टुडिओज, मणिकर्णिका फिल्म्स आणि परमहंस क्रिएशन्स यांनी युनोइया फिल्म्स एलएलपी आणि फ्लोटिंग रॉक्स एंटरटेनमेंट प्रा. लि. यांच्या सहकार्याने केली आहे.


२६/११च्या मुंबईवरील भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर 'भारत भाग्य विधाता'ची कथा आकार घेते. मुंबईतील कामा आणि आल्ब्लेस रुग्णालयात दहशतवाद्यांनी प्रवेश केल्यानंतर निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीत डॉक्टर, परिचारिका, वॉर्ड कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी आणि रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या असामान्य धैर्याचे चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. स्वतःच्या सुरक्षेसाठी पुरेशी साधने नसतानाही या कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवापेक्षा रुग्णांच्या जीवाला प्राधान्य दिले. भीती आणि संकटाच्या वातावरणातही कर्तव्यापासून न डगमगता त्यांनी रुग्णांचे संरक्षण केले. त्याग, करुणा, माणुसकी आणि संकटांवर मात करण्याची जिद्द या भावनांचा प्रभावी वेध चित्रपटातून घेण्यात आला आहे. चित्रपटात कंगना रणौत यांच्यासह गिरिजा ओक, स्मिता तांबे आणि इतर कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. अभिनेत्री आणि निर्माती कंगना रणौत यांनी २६/११च्या हल्ल्यावेळी दहशत आणि माणुसकी यांच्यामध्ये निर्भयपणे उभ्या राहिलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कथा पडद्यावर आणणे आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे म्हटले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या औचित्याने हा चित्रपट प्रेक्षकांसमोर येत असल्यामुळे त्यातून मिळणारा संदेश अधिक अर्थपूर्ण असल्याचेही त्यांनी सांगितले. देशाच्या सीमेवर संरक्षण करणाऱ्या जवानांप्रमाणेच संकटाच्या वेळी सामान्य नागरिकांमधूनही असामान्य शौर्य समोर येते, याची आठवण हा चित्रपट करून देतो, असे कंगना यांनी नमूद केले.

लेखक-दिग्दर्शक मनोज तापडिया यांनी २६/११ची घटना आजवर फारशी समोर न आलेल्या दृष्टिकोनातून सांगण्याचा उद्देश असल्याचे सांगितले. संरक्षण दलांनी दाखवलेले शौर्य देशाच्या कायम स्मरणात आहे; मात्र त्याच रात्री कामा रुग्णालयाच्या आतही डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत रुग्णांची काळजी घेत असामान्य धैर्य दाखवले. त्यांच्या जिद्दीला, माणुसकीला आणि शांतपणे दाखवलेल्या शौर्याला हा चित्रपट सलाम असल्याचे त्यांनी सांगितले.

झी५च्या व्यवसाय प्रमुख आणि 'अँड टीव्ही'च्या मुख्य वाहिनी अधिकारी कावेरी दास यांनीही हा चित्रपट धाडसी आणि अर्थपूर्ण कथांच्या मालिकेतील महत्त्वाची भर असल्याचे म्हटले. २६/११च्या घटनेतील डॉक्टर, परिचारिका, वॉर्ड कर्मचारी आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या धैर्यावर या चित्रपटातून प्रकाश टाकण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## ५९ वर्षीय महिलेचा मृत्यू

■ घोडेगाव (दै. संध्या)



कोलदरा (ता. आंबेगाव) येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून सुमन शिवाजी काळे (वय 59 वर्षे) यांची मारहाणीत हत्या झाली आहे. याप्रकरणी 22 वर्षीय गौरव नितीन काळे याच्यावर गुन्हा दाखल झाला असून आरोपीला तात्काळ घोडेगाव पोलिसांनी अटक केली आहे.

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.**
Pune Metropolitan
नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे ४११०४४.
Email: ad.pmrda@gmail.com

**ई-निविदा नोटीस क्र. २७ सन-२०२६-२७**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्यालय इमारतीमध्ये प्रवेश नियंत्रित अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली (Access Controlled Visitor Management System) बसविण्याकरिता ई-निविदा प्रकियेद्वारे एजन्सी नियुक्तीसाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

या उपरोक्त निविदा दस्तऐवज https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावरून दि. १० ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ३.०० पासून डाऊनलोड करता येईल. सदर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत आहे. निविदेमधील कोणतेही बदल https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

सही/-
सह आयुक्त, प्रशासन
पुणे महानगर प्रदेश
विकास प्राधिकरण पुणे

जा.क्र. १४१/२०२६
दिनांक -०७/०८/२०२६

**जाहीर नोटीस**

अँड. किरण सुधीर मते, ऑफिस नं. ६ साकार नगरी, जुन्नर रोड, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांजतर्फे आमचे अशिल तर्फे जाहीर नोटीस देण्यात येते ती खालीलप्रमाणे,

तमाम नागरिकांस विशेषतः गाव मौजे जांबूत, ता. शिरूर, जि. पुणे व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत ही सौ. इंदुबाई सुभाष सोनवणे यांचे मालकीहक्क, ताबेवहीवाटीची आहे. सदर मिळकत आमचे अशिल यांना खरेदी करावयाची आहे. त्याबाबत आमचे अशीलांनी संबधीत व्यक्तींशी व्यवहाराची बोलणी केलेली असून, त्याबाबतची इसार रक्कमही दिलेली असून, रजि. खरेदीखत करणार आहेत. त्यामुळे भविष्यात कोणाताही वाद निर्माण होऊ नये म्हणून, सदरची नोटीस प्रसिद्धीसाठी दिलेली आहे.

तरी खाली नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लिज, बक्षिस, खरेदी-विक्री, साठेखत, लिज-लिन, चोळी बांगडी, वाटप, पोटगी, रिझव्हेशन, रस्ता, वहिवाट, व इतर वारसा हक्क इत्यादी स्वरूपाचे वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत खालील पत्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा. व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून, सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही, व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे आशिल सदर मिळकती संदर्भातील व्यवहार पूर्ण करतील, मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोटतुकडी ता. शिरूर, जिल्हा परिषद पुणे, पं. स. शिरूर, मा. दुय्यम निबंधक सो. शिरूर यांचे हद्दीतील गाव मौजे जांबुत येथील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे,

| गट नं. | क्षेत्र. (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७/१/२ | ००.१६ | ०.१२ |

यांसी चतुसिमा खालीलप्रमाणे,
पूर्व- गट नं. ९ — दक्षिण- गट नं. ६६०, ६५५
पश्चिम - गट नं. ५, ६ — उत्तर- गट नं. १६ ते २४

यापैकी दक्षिण कोपऱ्यातील पश्चिम बाजुकडील
००.११

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकत त्यातील अंगभूत वस्तुसह, जाणे येण्याचे वहिवाटीचे सर्व हक्क व सर्व इजमेंटरी राईट्सह दरोबस्त मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस

दि. ०९/०८/२०२६

शिक्का

सही/-
श्री. किरण सुधीर मते
अँडव्होकेट
महा./८५००/२०२१
Mob. No. 9730573347
Office Add - Sakar Nagari, Junnar road,
Narayangan, Tal. Junnar, Dist. Pune, 410504.

## थोडक्यात पण महत्वाचे

### शहरातील रुग्णालयांसमोरील 'नो पार्किंग' फलकांचा फेरआढावा घ्या

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध रुग्णालयांसमोरील रस्त्यांवर लावण्यात आलेल्या 'नो पार्किंग' फलकांचा फेरआढावा घेऊन रुग्णांच्या नातेवाईकांवर करण्यात येणारी दंडात्मक कारवाई थांबवावी, अशी मागणी शिवसेना प्रवक्ते तथा युवासेना पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष चेतन बेंद्रे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी वाहतूक विभागाचे उपायुक्त विक्रांत देशमुख यांची भेट घेऊन निवेदन साद केले. निवेदनात चेतन बेंद्रे यांनी म्हटले आहे की, रुग्णालयात येणारे नागरिक हे उपचार, वैद्यकीय तपासणी, आपत्कालीन सेवा किंवा गंभीर रुग्णांना दाखल करण्यासाठी येत असतात. अशा वेळी रुग्णाला शक्य तितक्या लवकर रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक असते. मात्र अनेक रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या संख्येच्या तुलनेत पुरेशी वाहनतळ व्यवस्था नसल्याने नातेवाईकांना काही काळासाठी रस्त्याच्या कडेला वाहन उभे करावे लागते. अशा परिस्थितीत 'नो पार्किंग' नियमाचा आधार घेत वाहनांवर दंड आकारणे किंवा वाहने उचलण्याची कारवाई केल्यास रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे वाहतूक विभागाने अशा प्रकरणांमध्ये संवेदनशीलता दाखवून परिस्थितीनुरूप निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. चेतन बेंद्रे यांनी रुग्णालयांमधील पार्किंग सुविधांचाही प्रश्न उपस्थित केला. ज्या रुग्णालयांमध्ये वाहनतळाची व्यवस्था अपुरी अथवा उपलब्ध नाही, अशा ठिकाणी प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित संस्थांवर आवश्यक ती कारवाई करावी. केवळ रुग्णांच्या नातेवाईकांवर दंडात्मक कारवाई करून वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न सुटणार नसल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच रुग्णालयांसमोरील 'नो पार्किंग' क्षेत्र निश्चित करताना रुग्णवाहिका, रुग्णांना उतरविणे-चढविणे, आपत्कालीन प्रवेशद्वार आणि अल्पकालीन वाहन थांबविण्याची गरज यांचा स्वतंत्रपणे विचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली. "वाहतूक शिस्त आणि रुग्णांच्या अडचणी यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. नियम नागरिकांच्या सोयीसाठी असले पाहिजेत. मात्र आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत मानवी दृष्टिकोनातून निर्णय घेणे तितकेच महत्त्वाचे आहे," असे चेतन बेंद्रे यांनी यावेळी सांगितले.

### क्रांतिदिनानिमित्त महापालिकेच्या वतीने थोर क्रांतिकारकांना अभिवादन

**पिंपरी : दैनिक संध्या**

"देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी केलेला त्याग, संघर्ष आणि बलिदान हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अमूल्य पर्व आहे. देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांमुळेच आज आपण स्वातंत्र्य अनुभवत आहोत. त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या विचारांचे स्मरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे हा वारसा भावी पिढ्यांनी जपणे आवश्यक आहे, हुतात्म्यांच्या बलिदानातून देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, धैर्य आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घेऊन तरूणांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी योगदान देण्याची गरज आहे," असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. "इन्कलाब जिंदाबाद","भारत माता की जय", "वंदे मातरम" अशा घोषणांनी भारतमातेचा जयजयकार करत ९ ऑगस्ट क्रांती दिन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी संपन्न झाला यावेळी उपमहापौर बाबर या बोलत होत्या. महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीदिनानिमित्त चिंचवड येथील हुतात्मा चापेकर बंधूंच्या समूह शिल्पास, चिंचवड स्टेशन येथे क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि थोर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास तसेच दापोडी येथील शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे पुष्पहार अर्पण करून आज उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शहरातील विविध ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमांस विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, ब प्रभाग अध्यक्ष मंदार देशपांडे, नगरसदस्या राजू बनसोडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, माई काटे,प्रतिक्षा जवळकर,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते नितीन घोलप,प्रसाद केसरे, स्वप्निल वाघमारे, युवराज दाखले, मयूर घोलप,विशाल वाळुंजकर, गणेश वाळुंजकर,सुभाष सिंगल,धर्मेंद्र क्षीरसागर,आबा कोळेकर,संजय बाईत,अनिता वाळुंजकर आदी उपस्थित होते. चिंचवड गावातील थोर क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर यांनी बाळकृष्ण आणि वासुदेव या बंधूसह पुण्यामध्ये औंध येथील गणेशखिंडीत रॅन्ड या जुलमी इंग्रज अधिकाऱ्याची हत्या केली आणि देशाच्या क्रांतीच्या इतिहासातील क्रांतीची मशाल अधिकच प्रज्वलीत केली. त्यांच्या या कृत्याबद्दल इंग्रजांनी चापेकर बंधूना आणि त्यांचे सहकारी महादेव रानडे यांना फाशीची शिक्षा दिली गेली, त्यांच्या स्मरणार्थ चिंचवड येथे हुतात्मा चापेकर चौकात चापेकर बंधू तसेच त्यांचे सहकारी रानडे यांचे भव्य समूह स्मारक बांधण्यात आले आहे. चिंचवड स्टेशन येथे क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि वासुदेव बळवंत फडके यांचा पुतळाआहे. वस्ताद लहुजी साळवे हे आद्य क्रांतीगुरू दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, निशानेबाजी यासारख्या युद्धकलेत निपुण होते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यासारख्या अनेक क्रांतिकारकांच्या फौजा तयार केल्या होत्या. दापोडी येथे शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे यांचा पुतळा आहे. इन्कलाब जिंदाबाद अशा घोषणा देत शहीद भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झाले.त्यांच्या बलीदानामुळे देशातील स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा मिळाली तर हुतात्मा नारायण दाभाडे हे देखील लहान वयात देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात शहीद झाले. उपमहापौर शर्मिला बाबर यांनी भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात पिंपरी-चिंचवड शहराचे देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान आहे असे सांगून शहरातील तसेच देशातील ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिक ,शहीद तसेच वीर जवानांच्या प्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

### एमडी ड्रग्जच्या तस्करीचा पर्दाफाश; ७ लाख ३८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पिंपरी : दैनिक संध्या**

अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या कारवाईत चिखली परिसरात एमडी (मेफेड्रोन) या अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. पोलिसांनी चार आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून सुमारे ७ लाख ३८ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ९.२० वाजण्याच्या सुमारास हरगुडे वस्ती ते स्पाईन रोडकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर संशयितांची हालचाल आढळून आली. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत आरोपींकडून ७३ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ, एक चारचाकी वाहन, एक दुचाकी, मोबाईल फोन तसेच रोख रक्कम असा एकूण ७ लाख ३८ हजार रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये समशुद राजाबली शहा (वय २३, हरगुडेवस्ती), साहबन मोहम्मद इलियास शहा (वय २१, प्रथमेश पार्क, कुदळवाडी), सोहेल कादिर शेख (वय २९, पिंपळे गुरव), अभिराज जोखुराम कोरी (वय ३३, हरगुडेवस्ती) यांचा समावेश आहे. तर हर्ष यादव (केडीसी, मुंबई) याचा शोध पोलिस घेत आहेत. प्राथमिक तपासात आरोपी एमडी अंमली पदार्थाची बेकायदेशीर विक्री व वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी अंमली पदार्थांच्या विरोधातील मोहिम अधिक तीव्र करत अशा बेकायदेशीर कारवायांवर कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे.



# महिन्याचा वारी प्रवास पूर्ण : माऊलींची पालखी आळंदीत

■ पिंपरी (दै. संध्या)

आषाढी वारी सोहळा पूर्ण करून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा आज आळंदी नगरीत दाखल झाला. तब्बल महिनाभराचा पायी प्रवास, लाखो वारकऱ्यांची साथ, टाळ-मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमलेला वारीचा प्रवास आज माऊलींच्या आळंदीच्या समाधी मंदिरात विसावला.

आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्याने विविध मुक्काम आणि टप्पे पार करत आषाढी एकादशीला पंढरपुरात प्रदक्षिणा मार्गाने विठ्ठल-रखुमाईच्या मंदिराला प्रदक्षिणा पूर्ण करत... पौर्णिमेला विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेत. परतीचा प्रवास सुरू झाला. पंढरपूरहून पुन्हा आळंदीच्या दिशेने निघालेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्यात हजारो वारकरी सहभागी झाले होते.

महिनाभराच्या या भक्तिमय प्रवासात ऊन, पाऊस, चिखल आणि विविध अडचणींची पर्वा न करता वारकऱ्यांनी माऊलींच्या चरणी आपली सेवा अर्पण केली. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि भगव्या पताकांनी सजलेला वारीचा मार्ग पुन्हा एकदा भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला. आता माऊलींच्या पालखीचे आळंदीत आगमन झाल्याने आषाढी वारीच्या या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक प्रवासाची सांगता झाली आहे. महिनाभराचा खडतर प्रवास पूर्ण करून माऊली पुन्हा आपल्या आळंदीत दाखल झाल्याने वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## रावेत येथील सिटी प्राईड स्कूल परिसरात भटक्या कुत्र्यांचा प्रचंड त्रास

■ रावेत(दै. संध्या)

रावेत येथील सिटी प्राईड स्कूल आणि लगतच्या निवासी परिसरात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांत परिसरात कुत्र्यांनी चिमुकल्यांवर हल्ला करून चावल्याच्या घटना घडल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत मुख्य रस्ते, अंतर्गत गल्ल्या तसेच शाळेजवळील परिसरात भटक्या कुत्र्यांचे टोळके दिसून येतात. अनेक वेळा हे कुत्रे पादचारी, विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांच्या अंगावर धावत असल्याने अपघाताचा तसेच जखमी होण्याचा धोका वाढला आहे.

अलीकडेच काही विद्यार्थ्यांवर कुत्र्यांनी हल्ला करून त्यांना जखमी केल्याच्या घटनांमुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे लहान मुलांना एकटे शाळेत पाठविण्यास अनेक पालक धजावत नसल्याचे चित्र आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. "शाळेत जाणाऱ्या मुलांच्या जीवाला थेट धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने वेळेत लक्ष न दिल्यास एखादी गंभीर घटना घडू शकते.

## कै. काळभोर यांच्या १२ व्या पुण्यस्मरणानिमित्त अनाथ व दिव्यांग मुलांना मदतीचा हात

■ पिंपरी (दै. संध्या)

कै. विलास (आप्पा) रघुनाथ काळभोर यांच्या १२ व्या पुण्यस्मरणानिमित्त कै. विलास आप्पा काळभोर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अजय भाऊ काळभोर यांच्या पुढाकाराने अनाथ व दिव्यांग मुलांसाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत पुण्यस्मरणाचा दिवस सेवाभावी कार्यातून साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत प्रथम रावेत येथील झूंज दिव्यांग संस्था, आश्रम प्रशिक्षण केंद्र येथे अनाथ व दिव्यांग मुलांना गरजेच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. मुलांच्या दैनंदिन उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचे वितरण करून त्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



त्यानंतर थेरगाव येथील इमॅन्युअल ऑर्फनेजमध्ये अनाथ मुलांसाठी अन्नदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी मुलांना भोजन देऊन त्यांच्यासोबत संवाद साधण्यात आला. उपस्थितांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे पदाधिकारी, मित्र परिवार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सेवाभावी उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करत अजय भाऊ काळभोर यांच्या सामाजिक कार्याचे अभिनंदन केले. कै. विलास आप्पा काळभोर यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन पुढेही सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## मोक्का गुन्ह्यातील सहा महिन्यांपासून फरार आरोपीला कर्नाटकातून अटक

■ पिंपरी (दै. संध्या)

चिखली पोलीस ठाण्याच्या गुन्हे तपास पथकाने मोक्का कायद्यांतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यातील सहा महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला कर्नाटक राज्यातून अटक करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. पोलिसांना सातत्याने गुंगारा देत ठिकाणे बदलणारा आरोपी अंबादास राजू राठोड याला शिताफीने जेरबंद करण्यात आले.

चिखली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांकातील बीएनएस व मोक्का कायद्यांतर्गत गुन्ह्यात आरोपी अंबादास राठोड हा मागील सहा महिन्यांपासून फरार होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू होते. मात्र आरोपी सतत ठिकाण बदलत असल्याने तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता. दरम्यान, गुन्हे तपास पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी कर्नाटकातील गुलबर्गा परिसरात असल्याचे समोर आले. विशेष बाब म्हणजे, या संपूर्ण कारवाईत कोणत्याही तांत्रिक साधनांचा वापर न करता केवळ पारंपरिक गुप्त बातमीदारांच्या अचूक नेटवर्कच्या मदतीने पोलिसांनी आरोपीचा माग काढला. त्यानंतर कर्नाटक राज्यातील कलगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचून अंबादास राठोड याला अटक करण्यात आली. ही कारवाई पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त बसवराज तेली, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर आणि सहायक पोलीस आयुक्त प्रवीण मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित जाधव, पोलीस निरीक्षक अमोल फडतरे, सहायक पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण तसेच विनोद होनमाने, प्रवीण भोमाळे, अरुण साबळे हजर होते.

## पिंपरी चिंचवडमध्ये १८ ऑगस्ट रोजी मातंग समाजाचा "जनआक्रोश महामोर्चा"

■ पिंपरी (दै. संध्या)

अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ पिंपरी-चिंचवड शहरात १८ ऑगस्ट २०२६ रोजी मातंग समाजाच्या वतीने भव्य जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समर्थन मातंग समाज कृती समिती, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात येणार असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या महामोर्चाची सुरुवात गुरुवर्य लहुजी वस्ताद साळवे पुतळा, चिंचवड स्टेशन येथून सकाळी १० वाजता होणार असून, मोर्चा चिंचवड स्टेशन ते निगडी तहसील कार्यालय असा मार्गक्रमण करणार आहे. तहसील कार्यालयासमोर मोर्चाचा समारोप होणार आहे. आयोजकांच्या मते, अनुसूचित जातींमधील विविध घटकांना न्याय्य प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्याय मिळावा, यासाठी आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी आवश्यक आहे. या मागणीसाठी संविधानिक आणि लोकशाही मार्गाने शासन व प्रशासनापर्यंत समाजाचा आवाज पोहोचविण्याचा उद्देश या जनआक्रोश मोर्चामागे असल्याचे समितीने स्पष्ट केले

# पिंपरीत लिंगायत गवळी समाज गौरव राज्यस्तरीय पुरस्कार संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

सोशल मीडियाच्या आभासी जगतामध्ये वावरताना, आपले करिअर घडत असताना नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य देखील पार पाडण्याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवावे. लिंगायत गवळी समाजातील तरुणाईचा उपयोग सक्षम, सुदृढ, सुसंस्कृत समाज उभारणीसाठी झाला पाहिजे. उच्च शिक्षण घेऊन पुढे गेलेल्या तरुणांनी आपल्या मागच्या पिढीला मार्ग दाखविला पाहिजे अशी अपेक्षा महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष वसंत नामा गवळी यांनी व्यक्त केली.

शनिवारी, (दि.८) पिंपरी येथे लिंगायत गवळी विकास फाउंडेशन या संस्थेच्या वतीने लिंगायत गवळी समाजाचा "समाज गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२६" सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात १० वी आणि १२ वी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विठ्ठल हुच्चे, सोनाली डोईजड, प्रशांत काटकर, संतोष बारसे, भारवी चौधरी, रोशन लंगोटे, श्रुती चौधरी, ॲड. चैताली नामदे, ऋतुजा बहिरवाडे, जयकुमार बीडकर यांचा "समाज गौरव पुरस्कार – २०२६" देऊन आणि राजूभाऊ घुगरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, ग्लोबल टेकक्सीस इन्स्टिट्यूट चे संचालक प्रा. संभाजी बारसे, प्रा. भालचंद्र हुच्चे, खंडू बहिरवाडे, उमाकांत जोमीवाले, नगरसेविका अरुणाताई लंगोटे, गणेश लंगोटे, सुपाआप्पा पिरनाईक, डॉ. किसन झिपरे, प्रवीण हुंडीवाले, कृष्णा भाऊ गठरी, सुरेश शहापूरकर, बंटीभाऊ घुगरे, सोमनाथ



हिरणवळे, भगवान औशीकर, दयानंद श्रीलिंग, राजेंद्र लगडे, भीमराव घुगरे, अशोक आप्पा बहिरवाडे, मधुकर औरंगे, लक्ष्मण बहिरवाडे, पंडित आप्पा शहापूरकर, विठ्ठल उन्हाळे आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात नारायण बहिरवाडे यांनी सांगितले की, गवळी समाजाच्या परंपरागत व्यवसायाला चांगले दिवस राहिले नाहीत. आपल्या परंपरागत व्यवसायात अनेक सहकारी संस्था व कॉर्पोरेट कंपन्यांची स्पर्धा वाढली आहे. नव्या पिढीने उच्च शिक्षण घेऊन उद्योग व्यवसायाच्या नव्या वाटा शोधल्या पाहिजेत. प्रास्ताविक करताना प्रा. संभाजी बारसे यांनी सांगितले की, व्यावसायिक शिक्षण घेऊन आर्थिक उन्नती लवकर होते. त्यासाठी विद्यार्थ्यांना दहावी, बारावीच्या टप्प्यामध्ये योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवायला हवे. यासाठी लिंगायत गवळी विकास फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर घडवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल. हा सोहळा म्हणजे विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप आहे. कार्यक्रम आयोजनात प्रकाश चौधरी, वामन काटकर, मधुकर बिडकर, राजेश चौधरी आदींनी सहभाग घेतला होता.


## थोडक्यात पण महत्वाचे



### नारायणगाव येथे वृक्षदिंडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**नारायणगाव : दैनिक संध्या**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव संचलित श्रीमती सखुबाई उमाजी तांबे बाल निकेतन यांच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी वृक्षदिंडी मोठ्या उत्साहात काढण्यात आली. विठ्ठलनामाच्या गजरात, हरिनामाचा जयघोष आणि "झाडे लावा, झाडे जगवा" अशा पर्यावरणपूरक घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. बालनिकेतनच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत समाजाला वृक्षसंवर्धनाचा सुंदर संदेश दिला. वृक्षदिंडीच्या दिवशीच प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यासाठी एक रोप आणावे, असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रकारची रोपे बालनिकेतनमध्ये आणली. त्यानंतर ही सर्व रोपे ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव संचलित श्रीमान महादेव विठोबा तथा तात्यासाहेब भुजबळ कृषी शिक्षण संकुल येथे पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्या हस्ते लावण्यात आली. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे बालनिकेतनच्या चिमुकल्या बालगोपाळांनी स्वतःच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली. लहान वयातच निसर्गप्रेमाची बीजे त्यांच्या मनात रुजविण्याचा हा स्तुत्य उपक्रम उपस्थित सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. कृषी शिक्षण संकुलात वृक्षारोपण पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रोपे श्रीमती सखुबाई उमाजी तांबे बाल निकेतनच्या परिसरात प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गशिक्षिकांसमवेत लावली. शाळेचा परिसर अधिक हिरवागार, स्वच्छ व पर्यावरणपूरक करण्याचा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतः लावलेल्या रोपाचे संगोपन करण्याची जबाबदारीही स्वीकारली. यावेळी ग्रामोन्नती मंडळाचे चेअरमन रवींद्र पारगावकर यांनी विद्यार्थ्यांना, पालकांना व शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "आजचे चिमुकले विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांनी लावलेले प्रत्येक रोप हे हरित, समृद्ध आणि निरोगी भविष्यासाठी मोलाचे योगदान आहे. झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे." या वृक्षारोपण उपक्रमासाठी प्रा. राधाकृष्ण गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच मुख्याध्यापिका छाया भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकवृंदांनी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. उपक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी "झाडे लावू, झाडे जगवू आणि पर्यावरणाचे रक्षण करू" असा संकल्प केला. बालवाडीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी घेतलेला हा हरित संकल्प, त्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि निसर्गाप्रती असलेले प्रेम उपस्थितांकडून विशेष कौतुकास पात्र ठरले. पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजात रुजविणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.



### चाकण येथे छत्रपतींच्या पादुकांचे पूजन

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण येथील संग्राम दुर्ग किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र पादुकांचे विधीवत पूजन करण्यात आले. पंढरपूरला गेलेली पालखी चाकणला आल्यानंतर हा उपक्रम राबविण्यात आला. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अ‍ॅड.किरण झिंजुरके व अ‍ॅड. किशोर झिंजुरके यांच्या हस्ते पादुकांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक राजू दीक्षित, नामदेव पानसरे, राहुल वाडेकर, अनंत देशमुख, नामदेव पानसरे, भानुदास डोंगरे, मुरलीधर मंडलिक, अरुण जाधव, विद्या झिंजूरके, नम्रता कुलकर्णी, अरुणा सावंत, अ‍ॅड. दिव्या किरण झिंजुरके आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. एड. दिव्या झिंजुरके यांनी यावेळी सांगितले की," चाकण येथील शौर्यभूमी संग्राम दुर्ग किल्ल्यात अखंडितपणे सामाजिक उपक्रम राबवले जातात. यामध्ये सर्वांचा सहभाग असतो ही समाधानकारक बाब आहे. हे उपक्रम राबवणाऱ्या कार्यकर्त्यांना चाकणकरांनी प्रोत्साहन दिले पाहिजे." नम्रता कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

### चाकणला विशेष मतदार यादी पुनःनिरीक्षण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**चाकण : दैनिक संध्या**


शिवसेना चाकण शहर व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष मतदार यादी पुनःनिरीक्षण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारत निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी पुन:निरीक्षण मोहिमेअंतर्गत शिवसेना चाकण व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे जनसंपर्क कार्यालय यांच्या वतीने चाकण येथे वेळोवेळी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येते. मतदार यादी मॅपिंग प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व मदत करण्यात येत असून, या शिबिरांमध्ये संबंधित बीएलओ उपस्थित राहून नागरिकांची कागदपत्रे तपासणी, अर्ज स्वीकृती व आवश्यक कार्यवाही प्राधान्याने करीत आहेत. या मोहिमेची माहिती प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचावी, यासाठी चाकण शहरात प्रचार वाहनांद्वारे व्यापक जनजागृती सुरू आहे. शिवसेनेचे संबंधित बीएलओ यांच्या समन्वयाने नागरिकांना अर्ज भरणे, कागदपत्रांची पूर्तता करणे व मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सातत्याने मदत केली जात आहे. बीएलओ यांचे काम त्यामुळे अधिक सुलभ झाले असून, चाकण शहरातील बहुतांश भागात एसआयआर मोहिमेचे काम वेगात सुरू असल्याचे गटनेते नितीन गोरे यांनी सांगितले.

# वाडेगावत आयुष्मान आरोग्य मंदिराचा उद्घाटन सोहळा संपन्न

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

वाडेगाव आयुष्मान आरोग्य मंदिरात यापुढे आरोग्य अधिकारी डॉक्टरांनी चांगले लक्ष देऊन काम केले पाहिजेत. आपण वाडेबोल्हाई व वाडेगाव हे जिल्ह्यातील अत्याधुनिक आरोग्य केंद्र करण्यासाठी प्रयत्न करु असे प्रतिपादन आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी केले.

श्री क्षेत्र वाडेबोल्हाई (ता.हवेली) येथील वाडेगाव गावठाण लोकवस्तीत, जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या समोर उभारलेल्या आयुष्मान आरोग्य मंदिर (सरकारी दावाखाना) याच्या नूतन इमारतीचे उद्घाटन शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, वडगाव शेरीचे आमदार बापूसाहेब पठारे, जिल्हा परिषदेचे भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदिप कंद, यशवंत साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप, जिल्हा परिषद सदस्या सुरेखा रमेश हरगुडे, पंचायत समिती सदस्य कुशल सातव, वाडेबोल्हाई च्या लोकनियुक्त सरपंच पल्लवी प्रदिप शिंदे, उपसरपंच राणी नानासाहेब पायगुडे यांच्या हस्ते पार पडले. आयुष्मान आरोग्य मंदिर हे आता वाडेबोल्हाईतील वाडेगावात झाल्याने अत्यंत महत्वाचे काम गावच्या दृष्टीने झाले



आहे. आमचेही विकासाच्या बाबतीत लक्ष वाडेबोल्हाईकडे कायम असते व पुढे असेच राहणार आहे.

तसे वाडेबोल्हाई आता जलद विकासाच्या दृष्टीने पुढे प्रवास करीत असल्याचे मत व्यक्त करताना वडगाव शेरी मतदार संघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी सांगितले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसच्या हवेली तालुकाध्यक्ष सुरेखा भोरडे, वाडेबोल्हाई मुख्य आरोग्य केंद्राच्या आरोग्य वैद्यकीय अधिकारी स्नेहल घोडेराव, माजी सरपंच कुशाभाऊ गावडे, माजी उपसरपंच संजयराव भोरडे, जोगेश्वरी माता विद्यालय शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विद्याधर गावडे, ज्येष्ठ नेते कांताराम गावडे, कुबेर उद्योग समूहाचे चेअरमन रमेश हरगुडे, पंचायत समितीचे माजी सदस्य राहुल शिंदे, बोल्हाई माता देवस्थानचे अध्यक्ष बळीराम गावडे, माजी उपसरपंच सूरज भोरडे, दिंडीचे अध्यक्ष रामदास कोतवाल, सोसायटीचे चेअरमन प्रमोद गावडे, माजी उपसरपंच तुकाराम शिंदे, युवा नेते प्रदिप शिंदे,माजी उपसरपंच योगेश गायकवाड,माजी उपसरपंच महेश शिंदे, अशोक इंगळे, अंकुश लांडगे, माऊली ढवळे, संजय पायगुडे, वायरमन अमोल पायगुडे, उमेश साळुंके, पंडित पायगुडे, रमेश चव्हाण, बाळासाहेब पवार, गोपीनाथ भोरडे, मारुती ठवरे, कॉन्ट्रॅक्टर इंजिनिअर रविंद्र रामदास कुंजीर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन सूर्यवंशी, डॉ.लोहार, आदी विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांचे स्वागत वाडेबोल्हाईच्या लोकनियुक्त सरपंच पल्लवी प्रदिप शिंदे, उपसरपंच राणी नानासो पायगुडे, ग्रामपंचायत सदस्य संदिप गावडे, सदस्य सुमित शिंदे, सदस्या मोनाली नवनाथ भोर, सदस्या सोनाली काळूराम शिंदे, सदस्या सोनाली राहुल रिकामे, सदस्या संध्या योगेश गावडे, सदस्य नंदकुमार भोर, सदस्य संतोष चव्हाण, सदस्य गणेश भोरडे व ग्रामपंचायत अधिकारी संतोष भोसले यांनी केले. तर ग्रामपंचायतीने या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले होते. सरकारी दवाखान्याची इमारत किती सुंदर झाली.

त्यापेक्षा त्या इमारतीत मिळणारी सेवा किती सुंदर आहे हे महत्वाचे आहे.त्यामुळे येथील आयुष्मान आरोग्य मंदिर दवाखान्यात येणाऱ्या नागरिकांना सर्वोत्तम सुविधा द्या भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदिप कंद यांनी सांगितले. दवाखान्यातील डॉक्टर,आशा वर्कर,नर्सेस, व आरोग्य कर्मचारी यांनी लक्षपूर्वक काम करून आलेल्या रुग्णांना चांगला सेवा ,सुविधा द्याव्यात.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आमची आरोग्य खात्याला कायम मदत राहील असे जिल्हा परिषदेच्या सदस्या सुरेखा हरगुडे यांनी सांगितले.



# वडगाव आनंद येथे आरी वर्क प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ ओतूर (दै. संध्या)

ग्रामपंचायत वडगाव आनंद आणि युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आरी वर्क (भरतकाम) प्रशिक्षण व प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. महिनाभर चाललेल्या या प्रशिक्षणाला गावातील शंभरहून अधिक महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध कलाकुसरीचे प्रशिक्षण घेतले.

कार्यक्रमास आमदार श्री. शरद सोनवणे प्रमुख उपस्थित होते. यावेळी त्यांनी ग्रामपंचायत वडगाव आनंदच्या विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे आश्वासन दिले. तसेच पंचायत समितीच्या सभापती कमल शेळकंदे यांनी पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीसाठी राबविता येणारे विविध उपक्रम उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ग्रामपंचायत सदस्या सौ. निशा वाळुंज यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नातून सौ. रेखा भिसे व प्रशिक्षक सौ. सोनाली इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिनाभर हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

प्रशिक्षणादरम्यान महिलांनी आरी वर्क व भरतकामाच्या विविध प्रकारांचे कौशल्य आत्मसात केले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राजू चौगुले यांनी प्रभावीपणे केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य श्री. मंगेश अण्णा काकडे, पंचायत समिती सदस्य सपना शिंदे व जयसिंग पोटे, श्रीमती रेऊबाई बाळाजी देवकर विद्यालयाचे अध्यक्ष श्री. उल्हास देवकर, सामाजिक कार्यकर्ते डी.बी. वाळुंज,पोलीस पाटील दत्तात्रय चौगुले, प्रदीप देवकर, विकास सोसायटीचे चेअरमन प्रमोद गडगे, युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री. ईश्वर निमसे, संस्थेच्या बिझनेस मॅनेजर सौ. रेखा भिसे यांच्यासह ग्रामपंचायत वडगाव आनंदच्या सरपंच सौ.रेलिका जाधव, उपसरपंच श्री. संतोष पादिर, ग्रामपंचायत अधिकारी श्री. मुकणे भाऊसाहेब, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रशिक्षणामुळे ग्रामीण भागातील महिलांना कौशल्य विकासासोबतच स्वयंरोजगार व रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

# पोलिसांच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित

■ नारायणगाव (दै. संध्या)

पतीकडून झालेल्या मारहाणीची तक्रार करण्यासाठी सकाळी पोलीस ठाण्यात पोहोचलेल्या एका विवाहितेची, त्याच रात्री पोलिसांकडून 'मिसिंग' म्हणून नोंद करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नारायणगाव पोलीस ठाण्यात समोर आला आहे. पोलिसांच्या या परस्परविरोधी आणि संशयास्पद कारभारामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री एका विवाहितेला तिच्या पतीने बेदम मारहाण केली आणि तिच्या पाच महिन्यांच्या मुलीसह घरातून बाहेर काढून दिले. शेजाऱ्यांनी या मायलेकीला रात्रभर आसरा दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी पीडितेचे वडील तिला घेऊन नारायणगाव पोलीस ठाण्यात गेले. पोलिसांनी प्राथमिक माहिती नोंदवून घेतल्यानंतर, महिलेच्या कानाला गंभीर दुखापत झाल्याचे पाहून तिला वैद्यकीय तपासणीसाठी तिला चिठ्ठी दिली.

नारायणगाव ग्रामीण रुग्णालयात कान-नाक-घसा (ईएनटी) तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने संबंधित महिलेला पुढील उपचारासाठी प्रथम मंचर आणि त्यानंतर पिंपरी चिंचवड येथील वायसीएम रुग्णालयात पाठविण्यात आले. दिवसभर रुग्णालयात उपचार सुरू असताना, रात्रीच्या वेळी पतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी त्याच महिलेची 'मिसिंग' अशी नोंद केली. सकाळी स्वतः पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार देणारी आणि पोलिसांच्याच सांगण्यावरून उपचारासाठी गेलेली महिला रात्री अचानक ' मिसिंग' कशी होऊ शकते, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. पीडितेच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, पोलिसांकडे महिलेच्या उपचारासाठी गेल्याची माहिती असतानाही 'मिसिंग' ची तक्रार कोणत्या आधारावर स्वीकारण्यात आली. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी पीडितेच्या वडिलांनी केली आहे.

तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलीस महासंचालक आणि पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

- दुसऱ्या दिवशी सकाळी पीडितेचे वडील तिला घेऊन नारायणगाव पोलीस ठाण्यात गेले. पोलिसांनी प्राथमिक माहिती नोंदवून घेतल्यानंतर, महिलेच्या कानाला गंभीर दुखापत झाल्याचे पाहून तिला वैद्यकीय तपासणीसाठी तिला चिठ्ठी दिली.
- नारायणगाव ग्रामीण रुग्णालयात कान-नाक-घसा (ईएनटी) तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने संबंधित महिलेला पुढील उपचारासाठी प्रथम मंचर आणि त्यानंतर पिंपरी चिंचवड येथील वायसीएम रुग्णालयात पाठविण्यात आले.
- पीडितेच्या कुटुंबीयांचा आरोप आहे की, पोलिसांकडे महिलेच्या उपचारासाठी गेल्याची माहिती असतानाही 'मिसिंग' ची तक्रार कोणत्या आधारावर स्वीकारण्यात आली.

# स्टार हेल्थने महाराष्ट्रातील कुटुंबांसाठी प्रत्यक्ष आरोग्य विमा जनजागृती अभियान सुरू केले

■ दौंड(दै. संध्या)

वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी कुटुंबांसमोर दोन मुख्य चिंता तातडीने उभ्या ठाकतात: दर्जेदार उपचारांची उपलब्धता आणि त्यानंतर येणारा आर्थिक भार सांभाळण्याची क्षमता. अलिकडच्या वर्षांत भारतात आरोग्य विम्याचा विस्तार लक्षणीयरित्या झाला असला, तरी अनेक कुटुंबांना अजूनही आरोग्यावरील उपचारांसाठी स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करावा लागत आहे. यामुळे आर्थिक पूर्वतयारी हा संपूर्ण आरोग्य सुरक्षेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे.

या जागरूकतेतील दरी भरून काढण्यासाठी, भारतातील पहिली स्वतंत्र (स्टँडअलोन) आरोग्य विमा कंपनी असलेल्या स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने संपूर्ण महाराष्ट्रात महिनाभर चालणारा आरोग्य विमा जागरूकता रोडशो सुरू केला आहे.

# डॉ. गाडगीळ यांच्या 'चूजिंग गोल्ड' या आत्मचरित्राचे प्रकाशन

■ बारामती (दै. संध्या)

भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'चा वारसा वयाच्या मध्यतिशीत स्वीकारलेल्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय आणि नेतृत्वाचा प्रवास शब्दबद्ध केला आहे. त्यांचे आत्मचरित्र 'चूजिंग गोल्ड' हे पेंग्विन रँडम हाऊस इंडिया यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले आहे.

'चूजिंग गोल्ड' हे अत्यंतप्रामाणिक आणि वैयक्तिक अनुभवांवर आधारित असे पुस्तक आहे. भारतातील सर्वात जुन्या व्यावसायिक वारशांपैकी एकाचा वारसा तरुण वयात स्वीकारल्यानंतर, आज वयाच्या एकोणपन्नाशीत डॉ. सौरभ गाडगीळ यांनी आपल्या आयुष्याच्या प्रवासाकडे मागे वळून पाहत त्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय आणि शिकवणी यांचा प्रांजळ वेध घेतला आहे. हा प्रवास बाहेरच्या जगाला दिसणाऱ्या यशाचा नसून, त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेल्या वास्तवाचा आणि त्यातून घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचा आहे. या आत्मचरित्रात डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या आयुष्याला आकार देणारे अनेक महत्त्वाचे क्षण, आजोबा आणि आई यांच्यासोबतचे आयुष्यभर स्मरणात राहिलेले संवाद, काळाच्या ओघात उमगलेल्या गोष्टी तसेच त्यांच्या विश्वास, धैर्य आणि मूल्यांची कसोटी पाहणारे अनेक कठीण निर्णय यांचा प्रामाणिक वेध घेण्यात आला आहे.

# जुन्नर तालुक्यात सोयाबीन पेरणीचा टप्पा पूर्ण; भात लावणीलाही वेग

■ नारायणगाव (दै. संध्या)

चालू खरीप हंगामात वेळेवर झालेल्या समाधानकारक पावसामुळे जुन्नर तालुक्यातील शेती कामांना मोठा वेग आला आहे. जुन्नर तालुक्यात आतापर्यंत एकूण ९० ते ९२ टक्के क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. तालुक्यात यंदा सोयाबीन पिकाला शेतकऱ्यांनी मोठी पसंती दिली असून, तब्बल १४ हजार ७८५ हेक्टरवर सोयाबीनची विक्रमी पेरणी झाली आहे. तर दुसरीकडे, तालुक्याच्या पश्चिम भागात भात लागवडीच्या कामांना वेग आला असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर यांनी दिली आहे.

यंदा मान्सूनचे वेळेवर आगमन झाल्याने आणि सुरुवातीपासूनच समाधानकारक पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्यांची कामे जलद गतीने आटोपली आहेत. कृषी विभागाच्या प्राथमिक आकडेवारीनुसार, तालुक्यात आतापर्यंत ९२ टक्के खरिपाची कामे पूर्ण झाली असून त्यात सर्वाधिक क्षेत्र सोयाबीनचे आहे. सोयाबीनला बाजारात चांगला भाव मिळेल या आशेने शेतकऱ्यांनी या पिकाला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. सोयाबीन आणि भातासोबतच शेतकऱ्यांनी मका, बाजरी, तूर, मूग, उडीद आणि कापूस या इतर पिकांचीही मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे.

तसेच जुन्नर तालुक्यात इतर पिकांचीही पेरणी झाली असून, यामध्ये तृणधान्ये ७,८५० हेक्टर,भात ५,६४६ हेक्टर , भुईमूग ४५४ हेक्टर,मका १,६७४ हेक्टर आणि कडधान्ये ८२६ हेक्टर क्षेत्रावर पेरली गेली आहेत. आणे पठार आणि परिसरातील कृषी विक्रेते प्रशांत दाते व शेतकरी रोहिदास शिंदे



यांनी सांगितले की, पठारावर जवळजवळ १०० टक्के सोयाबीनची पेरणी पूर्ण झाली असून पिकांची स्थिती सध्या चांगली आहे. वेळेवर पाऊस झाल्याने शेतकरी समाधानी आहेत. मात्र, गेल्या वर्षी सोयाबीनला चांगला भाव मिळाला असल्याने यावर्षीही बाजारात तसाच योग्य भाव मिळेल का, अशी चिंता शेतकऱ्यांच्या मनात आहे. तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर यांनी माहिती दिली की, जुलैअखेर तालुक्यात सरासरीच्या १५८ टक्के पाऊस झाला आहे. सध्या सोयाबीनचे पीक वाढीच्या अवस्थेत असून पुढील काही महिन्यांत ते काढणीस तयार होईल.पिकांची नियमित पाहणी करावी आणि कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास तातडीने कृषी विभागाशी संपर्क साधावा, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### मुंबईत स्वतःचे घर मिळाल्याने विजेते भावूक



मुंबई : मुंबईसारख्या स्वप्नांच्या मायानगरीत आपलं स्वतःचं एक छानसं, हक्काचं घर असावं... हे प्रत्येक सामान्याचं सर्वात मोठं स्वप्न असतं. पण गगनाला भिडलेले घरांचे भाव आणि खिशाचा बसणारा ताळमेळ पाहता, 'आज घर घेऊ, उद्या घर घेऊ' असं म्हणत कित्येकांची हयात निघून जाते, पण स्वप्न मात्र अपूर्णच राहते. पण आशेचा किरण सापडला आणि काहीजणांचे घराचे स्वप्न साकार झाले. 'म्हाडा'कडून वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात गुरुवारी तब्बल २,६४० घरांची सोडत काढण्यात आली, तेव्हा तेथील वातावरण अगदी एखाद्या सणासारखे उत्साहाने भरून गेले होते. 'आज आम्हाला स्वप्नातील घर मिळाले, उद्या तुमचाही नंबर लागेल,' असा सूर विजेत्यांनी आळविला. सभागृहात जमलेल्या हजारो अर्जदारांच्या मनात तीव्र चिंता, धाकधूक आणि प्रचंड हुरहूर दाटली होती. प्रत्येकाची नजर स्क्रीनकडे आणि कान आपल्या नावाच्या घोषणेकडे लागले होते. आणि... जशी जशी विजेत्यांची नावे जाहीर होऊ लागली, तसा सभागृहात आनंद ओसंडून वाहू लागला. कोणाच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले, तर कोणाचा चेहरा समाधानाने उजळून निघाला. हक्काचे घर मिळाल्याचा तो आनंद शब्दांत वर्णन करता येण्याजोगा नव्हता. विजेत्यांनी एकमेकांना मिठी मारत एकच जल्लोष केला. सुखद धक्का आणि स्वप्नपूर्तीचे प्रसंग सांगताना प्रत्येक विजेत्याचा चेहरा उत्साहाने फुलला होता. निवृत्त झालेले दत्तू सांगळे अत्यंत आनंदाने म्हणाले, 'मी रिटायर्ड झालो, पण अर्ज भरणे सोडले नाही.' आज अखेर म्हाडाने माझे मुंबईतल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण केलेच. तर २०१३ पासून सातत्याने प्रयत्न करणाऱ्या सारिका लोखंडे यांना बोरीवलीत घर मिळाले. मी 'म्हाडा'मध्येच काम करते, पण घर लागत नव्हते. आज अखेर ते लागले. मी आशा सोडली नव्हती, तुम्हीही सोडू नका,' असा संदेश त्यांनी इतरांना दिला. विक्रोळीत हक्काची वास्तू मिळालेल्या शीतल राठोड आणि शुभांगी निकम यांचा तर आनंद गगनात मावेनासा झाला होता. मुंबईत स्वतःचे घर होणे यापेक्षा जगात दुसरा मोठा आनंदच असू शकत नाही, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. मालाडमध्ये राहणारे सुमित कदम यांना विक्रोळी-कन्नमवारनगरमध्ये घर लागल्याने ते अतिशय आनंदी होते. तर पहिल्याच धडाक्यात आणि बजेटमध्ये घर पदरात पडलेल्या प्रियंका सावर्डेकर तर खूप खूश होत्या. आनंद गगनात मावत नसल्याचे त्या म्हणाल्या.

### मुंबई लोकल ट्रेनमध्ये महिलेला बेदम मारहाण; बेल्ट काढून धमकावले

मुंबई : हार्बर मार्गावरील गोरेगाव-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) लोकलमध्ये एका पुरुष प्रवाशाने त्याच डब्यातील डॉली साहू या महिला प्रवाशाशी वाद घालत मारहाण केली. विनयभंग करुन बेल्ट काढत धमकावले. त्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अवघ्या १२ तासांत वडाळा रेल्वे पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या. घटना बुधवारी घडली. मोहम्मद रिझवान अन्सारी ( वय ३६) असे आरोपीचे नाव आहे. तो गोरेगाव ते सीएसएमटीकडे जाणाऱ्या लोकलमध्ये संध्याकाळी साडेपाचच्या दरम्यान जोगेश्वरी स्टेशनहून बसला. त्यावेळी डॉली लोकलच्या आसनावर झोपली होती. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला.

### विजयसिंह घाडगे, रणजीत पाटील, देवा चव्हाण यांना यंदाचा शौर्य पुरस्कार

पुणे : सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीद प्रत्यक्षात आणत स्वत:च्या जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या संरक्षणार्थ कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक विजयसिंह घाडगे, पोलीस अंमलदार रणजीत पाटील, देवा चव्हाण, पवन माने, पोलीस हवालदार निलेश भोरडे यांना यंदाचा ८ वा शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस् तर्फे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने शौर्य पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी दिली. कार्यक्रमाला लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर (निवृत्त) हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. तर, विंग कमांडर विनायक डावरे (निवृत्त) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याचे यंदा आठवे वर्ष असून समाजात शौर्य गाजवित अचंबित करणारी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी या पुरस्काराने गौरविण्यात येते. पोलीस क्षेत्रात कार्यरत असताना या सर्वांनीच समाज सुरक्षेबाबत देखील अत्यंत जागरुकपणे कार्य केले आहे. पुण्यातील गुन्हेगारीला आळा बसावा, याकरिता शौर्य गाजविणारे हे रिअल लाईफ सिंघम आहेत. त्यामुळे त्यांच्या शौर्याबद्दल त्यांना गौरविण्यात येणार आहे.

### करिअर मध्ये जबाबदारी आणि कर्तव्याचे भान ठेवा - वसंत नामा गवळी

पिंपरी, पुणे : सोशल मीडियाच्या आभासी जगतामध्ये वावरताना, आपले करिअर घडत असताना नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य देखील पार पाडण्याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवावे. लिंगायत गवळी समाजातील तरुणाईचा उपयोग सक्षम, सुदृढ, सुसंस्कृत समाज उभारणीसाठी झाला पाहिजे. उच्च शिक्षण घेऊन पुढे गेलेल्या तरुणांनी आपल्या मागच्या पिढीला मार्ग दाखविला पाहिजे अशी अपेक्षा महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष वसंत नामा गवळी यांनी व्यक्त केली. शनिवारी, (दि.८ ) पिंपरी येथे लिंगायत गवळी विकास फाउंडेशन या संस्थेच्या वतीने लिंगायत गवळी समाजाचा "समाज गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२६" सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात १० वी आणि १२ वी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विठ्ठल हुच्चे, सोनाली डोईजड, प्रशांत काटकर, संतोष बारसे, भारवी चौधरी, रोशन लंगोटे, श्रुती चौधरी, ॲड. चैताली नामदे, ऋतुजा बहिरवाडे, जयकुमार बीडकर यांचा "समाज गौरव पुरस्कार - २०२६" देऊन आणि राजूभाऊ घुगरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, ग्लोबल टेकक्सीस इन्स्टिट्यूट चे संचालक प्रा. संभाजी बारसे, प्रा. भालचंद्र हुच्चे, खंडू बहिरवाडे, उमाकांत जोमीवाले, नगरसेविका अरुणाताई लंगोटे, गणेश लंगोटे, सुपाआप्पा पिरनाईक, डॉ. किसन झिपरे, प्रवीण हुंडीवाले, कृष्णा भाऊ गठरी, सुरेश शहापूरकर, बंटीभाऊ घुगरे, सोमनाथ हिरणवळे, भगवान औशीकर, दयानंद श्रीलिंग, राजेंद्र लगडे, भीमराव घुगरे, अशोक आप्पा बहिरवाडे, मधुकर औरंगे, लक्ष्मण बहिरवाडे, पंडित आप्पा शहापूरकर, विठ्ठल उन्हाळे आदी उपस्थित होते.

### माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या साक्षीने 'नादब्रह्म' शिल्पाचे लोकार्पण

आळंदी : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या साक्षीने आणि 'ज्ञानोबा-माऊली'च्या जयघोषात आळंदी नगरपरिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या 'नादब्रह्म' शिल्पाचे लोकार्पण करण्यात आले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या संकल्पनेतून जुन्या व नव्या पुलाच्या मध्यभागी हे आकर्षक शिल्प साकारण्यात आले आहे. पालखी सोहळ्यातील विणेकरी, टाळकरी व पताकाधारक वारकऱ्यांच्या हस्ते शिल्पाचे लोकार्पण झाले. 'नादब्रह्म' शिल्पामध्ये वारकरी संप्रदायाच्या साधनेचे प्रतीक असलेले पखवाज, वीणा, टाळ, मृदुंग, तुळस, पताका तसेच अन्य संगीत साहित्याचे कलात्मक शिल्प साकारण्यात आले आहे.

# 'मेघालय भवन' विकास, संस्कृती आणि एकात्मतेचा संगम : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ नवी मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र आणि ईशान्य भारतातील मेघालय ही केवळ दोन राज्ये नसून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारी सहोदर राज्ये आहेत, महाराष्ट्र आणि मेघालय यांच्यातील सांस्कृतिक व आर्थिक नाते अधिक दृढ होत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. खारघर येथील प्लॉट नंबर १४, सेक्टर १६ येथे आयोजित 'मेघालय सदन' च्या जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. नवी मुंबई, ठाणे आणि रायगड हा संपूर्ण परिसर देशाच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेला मोठी गती देणार असून, हाच परिसर भारताच्या विकासाचे पुढील मुख्य केंद्र ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा, मेघालयचे उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग, मेघालयचे सामान्य प्रशासन विभाग मंत्री सोस्थेनिस सोहतुन यांच्यासह खासदार मिलिंद देवरा, आमदार मंदा म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, मेघालयचे मुख्य सचिव शकील अहमद, मेघालयच्या सामान्य प्रशासन विभागाचे आयुक्त व सचिव सिरिल व्ही. डी. डिएंगडोह, पनवेलचे महापौर नितीन पाटील, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सिडकोचे मुख्य महाव्यवस्थापक अश्विन मुद्गल, सिडकोचे सहव्यवस्थापक राजा दयानिधी, सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, पनवेल प्रांताधिकारी पवन चांडक, तहसिलदार मिनल भामरे तसेच मेघालयातील महाराष्ट्रात वास्तव्यास असणारे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र आणि मेघालयच्या राज्यगीताने या सोहळ्याचा प्रारंभ झाला. मेघालयातील जगप्रसिद्ध पारंपारिक नृत्य शैलीत मेघालयीन कलाकारांनी सादरीकरण केले. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनराड के.संगमा यांच्याकडे मेघालय भवनसाठीच्या जमिनीची कागदपत्रे हस्तांतरित करण्यात आली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन्ही राज्यांमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुबंधांवर प्रकाश टाकला. ईशान्य भारतातील विद्यार्थी, कलाकार आणि संगीत क्षेत्रातील दिग्गजांसाठी मुंबई व पुणे ही अत्यंत पसंतीची ठिकाणे आहेत. विशेषतः मेघालयच्या आत्म्यात वसलेल्या संगीताचा मुंबईच्या संगीत जगताशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यामुळेच खारघरसारख्या मोक्याच्या ठिकाणी आकारास येणारे हे मेघालय भवन केवळ एक इमारत नसून, मेघालयातून शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी किंवा कला सादरीकरणासाठी येणाऱ्या नागरीक व विद्यार्थ्यांसाठी हक्काचे घर ठरेल.

नवी मुंबई परिसराच्या होत असलेल्या अभूतपूर्व विकासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या भागात जागतिक दर्जाच्या १२ अव्वल



विद्यापीठांचा समावेश असणारी 'एज्यु-सिटी' आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'मेडी-सिटी' उभारली जात आहे. सोबतच देशातील ६० टक्के डेटा सेंटर क्षमता याच परिसरात निर्माण होत असून, हे क्षेत्र न्यू-एज आणि डीप-टेक उद्योगांचे केंद्र बनत आहे. पुढील १० ते १५ वर्षांत जेव्हा मेघालयचे नागरिक या वास्तूचा वापर करतील, तेव्हा या नियोजित आणि भविष्याभिमुख जागेचे महत्त्व त्यांना अधिक स्पष्टपणे जाणवेल. मेघालय भवनचे बांधकाम लवकरात लवकर आणि उत्कृष्ट दर्जाचे पूर्ण करण्यासाठी सिडको किंवा राज्य सरकारच्या यंत्रणांमार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी 'मेघालय भवन'साठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडको आणि स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांचे विशेष आभार मानले. मुंबईत उपचारासाठी येणारे रुग्ण, विद्यार्थी आणि

#### देशाची संसद कुशलतेने चालवली

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मेघालयचे माजी मुख्यमंत्री व लोकसभेचे माजी अध्यक्ष दिवंगत पी. ए. संगमा यांच्या संसदेतील अतुलनीय योगदानाचे भावूक स्मरण केले. अत्यंत खडतर राजकीय परिस्थितीतही चेहऱ्यावर हास्य ठेवून त्यांनी देशाची संसद कुशलतेने चालवली. त्यांचाच वारसा पुढे नेत मेघालयचे तरुण व गतिमान मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांनी गेल्या ६ ते ७ वर्षांत मेघालयची अर्थव्यवस्था दुप्पट केली आहे, अशा शब्दांत त्यांनी त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. केवळ या भवनापुरते मर्यादित न राहता, येत्या काळात महाराष्ट्र आणि मेघालय हे दोन्ही राज्ये संस्कृती आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्याने अधिक वेगाने पुढे जातील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

व्यावसायिकांची वाढती संख्या पाहता जुन्या मेघालय भवनमध्ये जागेची मोठी अडचण भासत होती. नीती आयोगाच्या बैठकीत संगमा यांनी विनंती करताच अवघ्या काही सेकंदांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जमिनीचा प्रस्ताव मान्य केला. या उपक्रमाला त्यांनी पूर्व आणि पश्चिम भारताला जोडणारा आणि देशाच्या एकात्मतेला अधिक बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा मानला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच ईशान्य भारतातील राज्ये आज देशात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनली असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रासोबतचे जुने संबंध आठवत संगमा यांनी आगामी काळात व्यापार, कृषी आणि संस्कृतीच्या क्षेत्रात भागीदारी अधिक मजबूत करण्याचा विश्वास व्यक्त केला. विशेषतः मेघालयची जगप्रसिद्ध 'लाखडोंग हळद', क्रीडा क्षेत्र आणि तेथील समृद्ध संगीत परंपरा मुंबई व महाराष्ट्राच्या माध्यमातून जगभरात पोहोचवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानत, त्यांनी 'मेघालय भवन'चे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

नवी मुंबईतील 'मेघालय भवन'च्या भूखंड हस्तांतरण प्रसंगी प्रास्ताविक करताना मेघालयचे मुख्य सचिव शकील अहमद यांनी या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र शासन, सिडको आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे विशेष आभार मानले. मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी येणारे रुग्ण, शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि उद्योजकांसाठी हे मेघालय भवन अत्यंत मोलाचे ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच,

महाराष्ट्राच्या सहकार्यामुळे मेघालयला आरोग्य, व्यापार आणि पर्यटनाच्या क्षेत्रात प्रगतीचे नवे मार्ग मिळतील, असे सांगत त्यांनी नव्याने लाभलेल्या खंबीर नेतृत्वामुळे मेघालय ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरल्याचे अधोरेखित केले.

## घोषणाप्रकरणी अटकपूर्व जामिनास कोर्टाचा नकार

■ मुंबई (दै. संध्या)

सत्र न्यायालयाने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या (टिस) कॅम्पसमधील कार्यक्रमाच्या दरम्यान उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्या सुटकेच्या घोषणा दिल्याप्रकरणी दोन विद्यार्थ्यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला. दिल्ली विद्यापीठाचे माजी प्राध्यापक जी.एन. साईबाबा यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी १० ते १२ विद्यार्थी वसतिगृहाजवळ एकत्र आले होते. 'विद्यार्थ्यांकडून कायद्याचा आदर राखण्याची अपेक्षा असते', असे निरीक्षण यावेळी न्यायालयाने नोंदवले.




ट्रॉम्बे पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या आणि त्यानंतर गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) वर्ग करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात ७ ऑगस्ट रोजी सत्र न्यायालयाने हे आदेश दिले आहेत.

कामाख्या दासच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये कथितरीत्या सीपीआय (माओवादी) सदस्यांनी प्रकाशित केलेली काही पुस्तके डाऊनलोड केल्याचे आढळले.

ही पुस्तके कोणत्या उद्देशाने डाऊनलोड केली आणि कथित घोषणांमागील हेतू काय होता, हे निश्चित करण्यासाठी तिला पोलिस कोठडी गरजेची असल्याचे न्यायालय म्हणाले. अभिरूप पॉलने 'इंडियन कम्युनिस्ट पार्टी (माओवादी)'च्या सदस्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके जतन केली. व्हॉट्सॲप संभाषणावरून त्याने विविध ठिकाणी फील्डवर्कसाठी भेटी दिल्याचे दिसते.

## सायन प्रतीक्षानगर संक्रमण शिबिरातील इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

■ मुंबई (दै. संध्या)

एकीकडे राहत्या घराचे छत्र हरवण्याची भीती आणि दुसरीकडे भविष्यातील पुनर्वसनाबाबत निर्माण झालेला मोठा संभ्रम, अशा दुहेरी संकटात सध्या सायनच्या प्रतीक्षा नगर संक्रमण शिबिरातील शेकडो कुटुंबे अडकली आहेत. येथील चार इमारती म्हाडाने आयआयटीच्या अहवालानंतर धोकादायक घोषित केल्याने आता आम्ही जायचे कुठे, असा आक्रोश रहिवाशांमधून व्यक्त होत आहे. याच वाढत्या असंतोषाची दखल घेत अखेर प्रशासनाला जाग आली असून, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पुढील आठवड्यात म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे.

सायन येथील प्रतीक्षा नगर संक्रमण शिबिरातील इमारत क्रमांक टी-३६, टी-३७, टी-५३ आणि टी-५४ या इमारती आयआयटीच्या अहवालानुसार धोकादायक घोषित करण्यात आल्या होत्या.

## डे केअर सेंटरमध्ये चिमुरड्याला प्लास्टिकच्या बाटलीने मारहाण

■ मुंबई (दै. संध्या)

कांजूरमार्ग पश्चिमेतील डे केअर सेंटरमध्ये सात वर्षांच्या मुलाला प्लास्टिकची बाटली फेकून मारल्याचा आरोप करत त्याच्या पालकांनी मनीषा वायंगणकर महिला कर्मचाऱ्याविरोधात विक्रोळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या घटनेत मुलाच्या वरच्या ओठाला दुखापत झाली आहे.

तक्रारदार स्मिथ कुबार पटेल यांच्या सात वर्षीय मुलाला शाळा सुटल्यानंतर दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत कांजूरमार्ग पश्चिम येथील 'युरो किड्स रुनवाल फॉरेस्ट'मध्ये डे केअरसाठी ठेवण्यात आले होते. ४ ऑगस्ट रोजी रात्री मुलाची आई त्याला घेण्यासाठी डे केअरमध्ये गेली असता त्याचा वरचा ओठ सुजलेला दिसला. स्टाफने मुलगा खेळताना पडल्याने दुखापत झाल्याचे सांगितले.

## ओसंग कंपनीच्या कामगारांना यंदा १५ टक्क्यांहून अधिक पगारवाढ

■ शिरूर (दै. संध्या)

ओसंग कंपनीतील कामगारांसाठी यंदाची पगारवाढ आनंदाची आणि समाधानाची ठरली असून, कंपनी व्यवस्थापनाने कामगारांना १५ टक्क्यांहून अधिक पगारवाढ दिली आहे. तसेच पगारवाढीचा तीन महिन्यांचा फरकाची रक्कमही कामगारांना देण्यात आली असून, कामगारांच्या आरोग्य विम्याच्या रकमेतही वाढ करण्यात आली आहे. कंपनी व्यवस्थापनाच्या या सकारात्मक निर्णयाबद्दल ओसंग कामगार असोसिएशन तसेच सर्व कामगारांच्या वतीने व्यवस्थापनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

कंपनी व्यवस्थापनाने कामगारांची मेहनत, प्रामाणिकपणा, सातत्यपूर्ण योगदान आणि कंपनीच्या प्रगतीतील सहभागाचा विचार करून घेतलेला हा निर्णय कामगारांच्या मनोबलात मोठी वाढ करणारा असल्याचे कामगार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी विशेषतः कंपनीचे एम.डी. Cho In Hwan सर, GM Park सर, GM Kim सर, GM Lee सर, प्रकल्प अधिकारी संतोष देशमुख, कंपनीचे व्यवस्थापक पार्श्वनाथ देसाई, डेव्हलपमेंट प्रमुख अनंत अंबोळकर, प्रोडक्शन प्रमुख शशिभूषण रहाणे तसेच कंपनीतील सर्व वरिष्ठ अधिकारी, विभागप्रमुख आणि व्यवस्थापनातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कामगार असोसिएशनच्या वतीने आभार मानण्यात आले. कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील विश्वास, संवाद, सहकार्य आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कंपनीच्या प्रगतीमध्ये कामगारांचे योगदान नेहमीच महत्त्वाचे राहिले असून, भविष्यातही प्रत्येक कामगार अधिक मेहनत, प्रामाणिकपणा, शिस्त आणि जबाबदारीने काम करून कंपनीच्या प्रगतीत योगदान देईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कामगारांच्या हिताचा विचार करून व्यवस्थापनाने दिलेली ही पगारवाढ तसेच आरोग्य विम्याच्या रकमेत केलेली वाढ निश्चितच कौतुकास्पद असून, यामुळे कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# मयुरेश्वर मंदिराचा पुरातन वारसा जपत दर्जेदार कामे करा

■ बारामती (दै. संध्या)

श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपती मंदिराचे पुरातन व धार्मिक महत्त्व जपत प्राचीन वास्तूचे मूळ स्वरूप अबाधित ठेवून आधुनिक सुविधांचा समन्वय साधावा. मंदिर परिसरातील विकास व जीर्णोद्धाराची कामे मंजूर आराखड्यानुसार दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिल्या.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बारामती तालुक्यातील श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपती मंदिर परिसर तसेच मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांची माहिती घेतली.

श्री क्षेत्र मयुरेश्वर मंदिर परिसरातील कामांचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, मंदिराच्या जिर्णोद्धाराची कामे मंजूर आराखड्यानुसारच करण्यात यावीत. मंदिर परिसर आणि गाभाऱ्यातील स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. परिसरात पावसाच्या पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होईल, याची दक्षता घ्यावी. विकासकामे करताना ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी सातत्याने समन्वय ठेवावा.

विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली



जाणार नाही, असे स्पष्ट करून त्या म्हणाल्या, कामांमध्ये हलगर्जीपणा किंवा चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी. निकृष्ट अथवा चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या कंत्राटदारांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

यानंतर उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी मेडद येथील स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाची पाहणी केली. महाविद्यालय परिसरातील रस्ते विकसित करण्यासाठी आवश्यक हद्दवाढीचा प्रस्ताव तातडीने मार्गी लावावा.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व निवासाच्या सुविधांचा विचार करून महाविद्यालय आणि वसतिगृह पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.


यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, वसतिगृह तसेच परिसरातील विविध सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती जाणून घेतली. तत्पूर्वी, त्यांनी श्री क्षेत्र मयुरेश्वर गणपतीचे दर्शन घेतले.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, पंचायत समिती सभापती किरण तावरे, जिल्हा परिषद सदस्या रोहणी कदम (ढोले), नगराध्यक्ष सचिन सातव, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक विलास वहाने, आदी उपस्थित होते.

दैनिक संध्या
सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६
www.dainikesandhya.com  www.youtube.com/@sandhyalivenews







## थोडक्यात पण महत्वाचे



### शिबिरात अवयवदाते कुटुंबाचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सन्मान

**बारामती : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील नागरिकांसाठी स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त खळद येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात अवयवदाते सुबनावळ कुटुंबीयांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मागील वर्षी इंदापूर तालुक्यातील कै. हिराबाई सुबनावळ यांचे ब्रेनडेड झाल्यानंतर उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फत कुटुंबीयांचे समुपदेशन करण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे पुत्र कैलास सुबनावळ यांनी अवयवदानासाठी सहमती दर्शविली. त्यांच्या या धाडसी आणि मानवतावादी निर्णयामुळे तब्बल पाच जणांना जीवनदान मिळाले. यावेळी कैलास सुबनावळ यांनी, “जळून राख होण्यापेक्षा आईला अवयवदानरूपी जिवंत ठेवले,” अशी भावना व्यक्त केली. इंदापूर तालुक्यातील एका छोट्या गावातील कुटुंबाने घेतलेला हा सामाजिकदृष्ट्या प्रेरणादायी निर्णय समाजासाठी आदर्श ठरत आहे. या शिबिरात तब्बल ८ हजार ८८० लाभार्थींनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला. शिबिरात तपासणीदरम्यान सुमारे २ हजार रुग्णांमध्ये विविध आजारांचे निदान झाले. या रुग्णांवर पुढील पंधरवड्यापासून महिनाभराच्या कालावधीत विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचार उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फत नियोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरात अवयवदानाबाबत जनजागृतीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी अवयवदानाचे महत्त्व, त्यातून मिळणारे जीवनदान आणि समाजातील गैरसमज दूर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे महादेव मगर (संपर्क ९८५०५१२२२३) यांनी कळविली आहे.



### शहिद झालेल्यांची प्रेरणा घेवून युवकांनी देशाची प्रगती केली पाहिजे : दिप्ती चवधरी

**बारामती : दैनिक संध्या**

९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त आज काँग्रेस भवन येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दिप्ती चवधरी यांच्या हस्ते “ध्वजारोहण” करण्यात आला. यावेळी बोलताना दिप्ती चवधरी म्हणाल्या की, “८ ऑगस्ट १९४२ साली मुंबईमध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन होते. त्या अधिवेशनामध्ये सर्वांनुमते ठराव झाला की इंग्रजांनी भारत देश सोडावा. त्यानुसार राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी ‘चले जाव’चा नारा दिला. त्याच दिवशी रात्री इंग्रज सरकारने काँग्रेसच्या सर्व नेत्यांना अटक करून तुरूंगात टाकले. ९ ऑगस्ट १९४२ ला अरूणा असफ अली यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींनी मुंबईच्या गवालिया टँक मैदानात तिरंगा झेंडा फडकविला. अशा अनेक महिला व लोखो सत्याग्रहींनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला. त्या ठिकाणी पोलीसांनी सत्याग्रहींवर लाठीचार्ज केला, आश्रू गॅस सोडले व गोळीबार केला. अनेक सत्याग्रही जखमी झाले व शहिद झाले. पुण्यामध्ये १६ वर्षीय नारायण दाभाडे हे काँग्रेस भवनमध्ये तिरंगा झेंडा फडकविण्यास येत असताना ब्रिटीशांनी केलेल्या गोळीबारात ते शहिद झाले. १९४२ च्या “भारत छोडो” आंदोलनामुळेच भारताच्या स्वातंत्र्याला कलाटनी मिळाली. या आंदोलनात शहिद झालेल्या शहिदांना अभिवादन करण्यासाठी ९ ऑगस्ट क्रांती दिन म्हणून पाळला जातो. या शहिदांची प्रेरणा घेवून युवकांनी देशाची प्रगती करावी.” यावेळी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी यांच्या समवेत नगरसेवक रफिक शेख, माजी नगरसेविका लता राजगुरू, अजित दरेकर, चंद्रशेखर कपोते, रमेश अय्यर, सचिन आडेकर, सेवादलाचे रविंद्र म्हसकर, लतेंद्र भिंगारे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, इंटक अध्यक्ष चेतन अगरवाल, राजाभाऊ कदम, सोशल मिडयाचे गुलाम हुसेन खान, बाळासाहेब अमराळे, निलेश बोराटे, द. स. पोळेकर, आण्णा राऊत, प्रविण करपे, आबा जगताप, सुरेश कांबळे, राजेंद्र पडवळ, मधुकर राऊत, देविदास लोणकर, प्रियंका रणपिसे, दिलीप लोळगे, हरिदास अडसूळ, अमित कांबळे, किशोर मारणे, संदिप मोकाटे, सुरेश नांगरे, ॲड. बाळासाहेब बाणखेले, फैय्याज शेख, ऋग्वेदिता सपकाळ, दिपक ओव्हाळ, अविनाश अडसूळ, प्रथमेश आबनावे, शाम काळे, हर्षद हांडे, विक्रम शहाणे, धनंजय पाटील, अस्लम मिरजकर, योगश माखणे, चैतन्य पुरंदरे, अन्वर शेख आदींसह असंख्य काँग्रेस कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### प्रकल्प रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात चाकणकर आक्रमक

**चाकण : दैनिक संध्या**



पुणे - नाशिक रेल्वे प्रकल्प रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात चाकणकर नागरिक आक्रमक झाले आहेत. रेल्वे प्रकल्प तातडीने पुन्हा सुरू करून रेल्वेचा मूळ व सरळ मार्ग कायम ठेवावा या मुख्य मागणीसाठी पुणे - नाशिक महामार्गावर चाकण येथील तळेगाव चौकात शिवसेना उबाठा, भापसे पार्टीचे नेते तसेच अन्य पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते गळ्यात गमजा घालून हातात झेंडे घेत जोरदार घोषणाबाजी करत एकत्रित आले होते. चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या या चक्काजाम आंदोलनाला खेडचे आमदार बाबाजी काळे, भापसे पार्टीचे अध्यक्ष दीपक ताटे, शिवसेनेचे पुणे जिल्हा प्रमुख रामदास धनवटे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, उद्योजक शाम राक्षे, पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश आरगडे, खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजय शिंदे, खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, भापसे पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा जयश्री ताटे, राजगुरुनगर सहकारी बँकेच्या संचालिका विजया शिंदे, उद्योजक अभिमन्यू शेलार, स्वामी कानपिळे, कुणाल कड, भगवान मेदनकर, प्रिया पवार, मंगेश सावंत, योगेश गायकवाड, महेश शेवकरी, रूपाली कांडगे, पांडुरंग गोरे, मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, आदी उपस्थित होते.

*“सुरक्षा आणि कार्यक्षमता अबाधित ठेवून रेल्वे मार्ग उभारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज आहे. एलिव्हेटेड ट्रॅक, बोगदा किंवा अन्य आधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून जीएमआरटीचे कामकाज सुरक्षित ठेवून रेल्वेचा मूळ मार्ग कायम ठेवण्याचा पर्याय तज्ज्ञांच्या मदतीने तपासण्यात यावा. पुणे - नाशिक रेल्वे प्रकल्प रद्द न करता सर्वसामान्यांना न्याय द्यावा.”*

*- दीपक ताटे, अध्यक्ष, भापसे पार्टी*

# ‘फ्रंटियर्स इन एथनोफार्माकोलॉजी’ राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

## नैसर्गिक उत्पादने, पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक उपचारपद्धतींच्या समन्वयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

■ **सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड यांच्या वतीने आणि सोसायटी फॉर एथनोफार्माकोलॉजी, इंडिया – पुणे चॅप्टर यांच्या सहकार्याने “Frontiers in Ethnopharmacology: Natural Products, Culture and Therapies” या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद व पोस्टर सादरीकरणाचे आयोजन ७ व ८ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले. नैसर्गिक उत्पादने, पारंपरिक औषधी ज्ञान, एथनोफार्माकोलॉजी आणि आधुनिक उपचारपद्धती यांचा समन्वय साधत औषधनिर्मिती व संशोधनाच्या नव्या संधींचा शोध घेणे हा परिषदेचा प्रमुख उद्देश होता. विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी तसेच औषधनिर्मिती क्षेत्रातील तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग नोंदविला. परिषदेच्या आयोजनामध्ये डॉ. वैभव शिलिमकर, HOD, Department of Pharmacognosy यांनी समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्राचार्या डॉ. आर. एस. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे नियोजन करण्यात आले. परिषदेच्या विविध वैज्ञानिक सत्रांमध्ये डॉ. मुरलीधर झोपे, डॉ. स्वप्निल बोरसे, डॉ. अमोल कुलकर्णी, डॉ. शैलेंद्र गुरव, डॉ. दीपक कसोटे आणि डॉ. दिगंबर मोकाट यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. आर. एस. चव्हाण यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय परिषदेतील पोस्टर सादरीकरणाला विद्यार्थ्यांचा व संशोधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध महाविद्यालयांतील सहभागींनी एथनोफार्माकोलॉजी, नैसर्गिक उत्पादने, हर्बल औषधे, औषधी वनस्पती आणि आधुनिक औषधनिर्मितीशी संबंधित संशोधन पोस्टर्स सादर केले. पोस्टर सादरीकरणाचे परीक्षण प्रा. मुक्ता अभ्यंकर, काशिबाई नवले कॉलेज ऑफ फार्मसी, सिंहगड तसेच प्रा. विद्या पाटणकर, वाघिरे कॉलेज यांनी केले. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या डॉ. आर. एस. चव्हाण, उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार आणि समन्वयक डॉ. वैभव शिलिमकर यांनी विशेष मार्गदर्शन केले. तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. समारोप प्रसंगी श्री. सुमित मुसळे यांनी आभार प्रदर्शन केले. सहभागी प्रतिनिधींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची तसेच संशोधनाच्या नव्या संधी जाणून घेण्याची मौल्यवान संधी मिळाली. निसर्गातील औषधी संपत्ती, पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम साधत संशोधनाला चालना देणे, हा या राष्ट्रीय परिषदेचा केंद्रबिंदू ठरला.



# पोलीस मित्र संघाच्यावतीने लोणी काळभोर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

■ **लोणी काळभोर (दै. संध्या)**

पोलीस मित्र संघाच्या वतीने लोणी काळभोर येथे नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. शिबिरामध्ये नागरिकांची उंची, वजन, बी.एम.आय. तसेच दंत तपासणी करण्यात आली. याशिवाय प्राथमिक आरोग्य तपासण्या करून तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी स्त्रीरोग तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यानही आयोजित करण्यात आले होते. आजारांकडे दुर्लक्ष न करता नियमितपणे आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले. ग्रामीण तसेच निमशहरी भागातील नागरिकांना आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी आणि आर्थिकदृष्ट्या गरजू नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीचा लाभ मिळावा, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष, पोलीस मित्र संघाचे श्रीरंग लोखंडे यांनी सांगितले. या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रयत्न पोलीस मित्र संघाने केला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस मित्र संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, विश्वराज हॉस्पिटलचे वैद्यकीय पथक तसेच अंबर विलास सोसायटीच्या सदस्यांनी सहकार्य केले. शिबिरासाठी पोलीस मित्र संघाचे सचिव सुमंत लोखंडे यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच म्हस्कुजी पिंगळे, सचिन मखर, हरिदास कोंडे, पवन खांबेकर आणि किशोर सानप यांचे सहकार्य लाभले. या शिबिराचा परिसरातील सुमारे १०० ते १२५ कुटुंबांनी लाभ घेतला. नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या करून घेत तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शन घेतले. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित झाले. शिबिरामध्ये नागरिकांची तपासणी करून तज्ज्ञ मार्गदर्शन केल्याबद्दल विश्वराज हॉस्पिटलच्या डॉ. दीपली गायकवाड, डॉ. मेनका जाधव, डॉ. गौरी नागरे, सौ. स्वाती वाघमारे, सुरेश शितोळे, किरण साळवे आणि विपुल शिंदे यांचे विशेष आभार मानण्यात आले.



# ‘गाड्या फोडू, थोबाड फोडू’ वक्तव्याच्या निषेधार्थ युवक काँग्रेस आक्रमक

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बॅनरबाजी

■ **पुणे (दै. संध्या)**

मावळचे आमदार सुनील (अण्णा) शेळके यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांबाबत “गाड्या फोडू आणि थोबाड फोडू” अशा स्वरूपाचे वक्तव्य केल्याचा आरोप करत पुणे जिल्हा युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. आमदार शेळके यांच्या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग परिसरात प्रश्न उपस्थित करणारे होर्डिंग्ज व बॅनर लावण्यात येत आहेत. या बॅनरच्या माध्यमातून पुणे जिल्हा युवक काँग्रेसने आमदार सुनील शेळके यांना थेट सवाल केले आहेत. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या गाड्या आणि थोबाड फोडण्याची भाषा करता, मग अजितदादांच्या मृत्यूबाबतच्या चौकशीची मागणी त्याच आक्रमकपणे करणार का, असा सवाल करण्यात आला आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील रखडलेल्या स्मारकाचे नेमके काय झाले, हा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमदार शेळके जाहीरपणे विचारणार का, असा प्रश्नही युवक काँग्रेसने उपस्थित केला आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या गाड्या फोडण्याची भाषा करणारे आमदार या प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांना जाब विचारणार का, तसेच मुख्यमंत्र्यांची गाडी अडविण्याची हिंमत दाखवणार का, असा थेट सवाल बॅनरच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

‘आहे का हिंमत आमदार साहेब?’ असा सवाल करत काँग्रेस कार्यकर्त्यांना धमकावण्यापेक्षा महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांवर सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची हिंमत दाखवावी, असे खुले आव्हान पुणे जिल्हा युवक काँग्रेसने दिले आहे.

लोकशाहीमध्ये राजकीय कार्यकर्त्यांना धमकावण्याची भाषा मान्य केली जाणार नाही. अशा वक्तव्यांना हिंसक पद्धतीने नव्हे, तर लोकशाहीच्या चौकटीत प्रश्नांच्या माध्यमातून उत्तर देण्याची भूमिका युवक काँग्रेसने घेतल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या आंदोलनात्मक भूमिकेला प्रसारमाध्यमांनी प्रसिद्धी द्यावी, असे आवाहन पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश प्रमोदराव पवार यांनी केले आहे.

# येरवडा खुले कारागृहात ध्यान-धारणा कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

■ **पुणे (दै. संध्या)**

येरवडा खुले कारागृहातील बंद्यांच्या मानसिक शांततेसह सकारात्मक विचारसरणी, आत्मिक समाधान आणि आध्यात्मिक विकासाला चालना देण्यासाठी माहेर महिला प्रतिष्ठान आणि मैत्री बोध परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ८ ऑगस्ट) विशेष ‘ध्यान व शक्ती प्रवाह’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाला बंदी तसेच कारागृहातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि पुणे विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. मैत्री बोध परिवारचे संस्थापक प्रेमावतार मैत्रेय दादाश्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन तासांचे ध्यानसत्र घेण्यात आले. या सत्रामध्ये उपस्थितांना ‘लोका लाइट’ तसेच दैवी शक्ती क्रियेचा अनुभव देण्यात आला. सध्याच्या धकाधकीच्या आणि अस्थिर वातावरणात समाजात प्रेम, शांतता आणि सकारात्मकता वाढविण्यासाठी आध्यात्मिक उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी संस्थापकांनी सांगितले. यावेळी बंदीवानांशी संवाद साधताना येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी प्रसिद्ध सुभाषिताचा दाखला देत आत्मज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, “नाना शास्त्र पठेन् लोका, नाना दैवत पूजनम्। आत्मज्ञान विना पार्थ, सर्व कर्म निरर्थकम्॥” माहेर महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विद्या म्हात्रे, उपाध्यक्षा निकीता लोकरे आणि सचिव डॉ. मीना सत्यशील बागे यांच्या विशेष पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाला मेघा नाईक, शैलेश नाईक, संगीता सौंदणकर, अजय देशमुख, रुद्रमुनी हुबलीमठ, संतोष सूर्यवंशी, रूपेश अ. मधमशेट्टीवार, संदीप अग्रवाल आणि हर्षल चव्हाण यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



यावेळी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी निशा श्रेयकर, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, सुनील गायकवाड, चंद्रकांत खांदवे, हवालदार वैशाली थोरात, लता पिसे, शिपाई शैला कदम, सरला साबळे, संध्या जाधवर, सुरेखा म्हात्रे, मिसबा सय्यद, मिश्रक अभिषेक रौंदळ, अशोक होले, राकेश पवार, मोहसीन जमादार, याकूब शेख यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बंदी उपस्थित होते. बंदींच्या सुधारणा, पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासासाठी येरवडा खुले कारागृह प्रशासनाकडून विविध सकारात्मक व विधायक उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या ध्यान-धारणा कार्यक्रमामुळे बंद्यांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जेचा अनुभव मिळाला.

# शेतकऱ्यांचे संघटन ठरले अपघातग्रस्ताच्या जीवासाठी देवदूत

## मोर्फाच्या सहकार्याने संकेत जमदाडे यांना मिळाले वेळेत उपचार

■ **मळद-बारामती (दै. संध्या)**

माणुसकी अजूनही जिवंत आहे, याचा प्रत्यय देणारी घटना नुकतीच घडली. मळद-बारामती येथील श्री. तुषार जगताप यांचे मेहुणे श्री. संकेत सत्यपाल जमदाडे, रा. शाहूनगर-गोडोली, जिल्हा सातारा हे काही दिवसांपूर्वी मोटरसायकलवरून सातारा येथून नाशिककडे जात असताना नाशिकपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर एका अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली. अपघातानंतर संबंधित वाहन घटनास्थळावरून निघून गेले.

अपघात झाल्यानंतर घटनास्थळी मोठ्या संख्येने नागरिक जमा झाले होते. मात्र, गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या संकेत जमदाडे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी कोणीही पुढाकार घेतला नाही. त्याचवेळी तेथे उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने त्यांच्या खिशातील डायरीमध्ये असलेल्या संपर्क क्रमांकावरून श्री. तुषार जगताप यांना फोन करून अपघाताची माहिती दिली.



ही माहिती मिळाल्यानंतर जगताप कुटुंबीयांसमोर मोठे संकट उभे राहिले. सातारा अथवा मळद येथून नाशिकला पोहोचण्यासाठी सात-आठ तासांचा कालावधी लागणार होता. “आम्ही तिथे पोहोचेपर्यंत पेशंटची अवस्था आणखी गंभीर होईल,” या विचाराने श्री. तुषार जगताप यांनी तातडीने मदतीसाठी कृषीभूषण प्रल्हाद वरे मळद-बारामती यांचेशी संपर्क साधला. त्यांनी घडलेला संपूर्ण प्रकार सांगून, “आपल्या मोर्फाच्या शेतकरी बांधवांकडून काही मदत मिळू शकेल का?” अशी विनंती केली. त्यावेळी श्री वर्षे यांनी त्यांना सांगितले की, “आपण प्रयत्न करूया; आपल्या शेतकरी बांधवांशी संपर्क साधूया,” असे सांगितले. त्यानंतर महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये कार्यरत असलेल्या *महा ऑरगॅनिक अँड रेसिड्यू फ्री फार्मर्स असोसिएशन (मोर्फा) च्या आसपासच्या शेतकरी बांधवांशी तातडीने संपर्क साधण्यात आला. परिस्थितीचे गांभीर्य समजावून सांगताच तेथील सहकाऱ्यांनी कोणताही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. मोर्फाच्या शेतकरी बांधवांनी तातडीने ॲम्बुलन्सची व्यवस्था केली, आणि संकेत जमदाडे यांना रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केले. सिटीस्कॅनसह आवश्यक वैद्यकीय तपासण्या व उपचार करण्यात आले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे संकेत जमदाडे यांचा जीव वाचविण्यात यश आले. विशेष म्हणजे, उपचारानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आणि ॲम्बुलन्सच्या माध्यमातून त्यांना सुरक्षितपणे साताऱ्याला पाठविण्यात आले. या संपूर्ण घटनेतून एक गोष्ट प्रकर्षाने समोर आली. संघटन केवळ शेतकऱ्यांच्या शेतीविषयक प्रश्नांसाठीच नसते, तर संकटाच्या काळात एकमेकांच्या मदतीला धावून जाणारे माणुसकीचे जाळेही उभे करू शकते. महा ऑरगॅनिक अँड रेसिड्यू फ्री फार्मर्स असोसिएशन (मोर्फा) हे शेतकरी असोसिएशन आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार आणि मा. श्री. युगेंद्रदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आले आहे. या संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर शेतकऱ्यांचे मोठे संघटन उभे राहिले आहे. संकेत जमदाडे यांच्या अपघाताच्या प्रसंगी याच संघटनेतील शेतकरी बांधवांनी दाखविलेली तत्परता ही संघटनेच्या ताकदीचे आणि “शेतकरी एकमेकांच्या सुख-दुःखात धावून येतो” या भावनेचे जिवंत उदाहरण ठरले आहे.

एखाद्याचा जीव वाचविण्यासाठी वेळ अत्यंत महत्त्वाची असते. त्या वेळी नातेवाईक दूर असले, तरी माणुसकी जवळ असली पाहिजे—आणि या प्रसंगी मोर्फाच्या शेतकरी बांधवांनी ती माणुसकी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिली. संकेत जमदाडे यांचा जीव वाचविण्यासाठी तातडीने मदत करणाऱ्या सर्व शेतकरी बांधवांचे मनःपूर्वक आभार. त्यांच्या या कार्याला मनापासून सलाम!